|| वाङ्मयवाणी ||

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

## मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त),

शिवाजीनगर, पुणे ५

मराठी विभाग त्रैमासिक

एप्रिल २०२०-२०२१

# वाङ्मयवाणी

**संपादक**

डॉ.वैजयंतीमाला जाधव

**संपादन समिती**

सर्व विद्यार्थी , एम ए . भाग १

|| वाङ्मयवाणी ||

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| संपादकीय... | – | ३ |
| विद्यार्थ्यांचे मनोगत... (प्रातिनिधिक) | – उमा रायकर | ४ |
| तपश्चर्या | – पूजा गोतारणे | ५ |
| मला ना... | – पूजा सुरेश पवार | ६ |
| श्रम | – केतन गेनबा लावाडे | ६ |
| सावधान आपलं हवामान बदलतंय... | – श्वेता संतोष शेटगावकर | ७ |
| संस्कार श्रेष्ठ | – अपूर्वा कांबळे | ८ |
| मज वाटे पुन्हा लहान व्हावे ! | – पूजा किशोर वाडेकर | ९ |
| आठवणीतले दिवस | – अपूर्वा कांबळे | १० |
| ...होऊ नये ! | – अविनाश काठवटे | १० |
| काही विचार | – मनुजा सावंत | १० |
| विनोद | – पूजा वाडेकर | १० |
| पद्मश्री दीपशिखा | – उमा रायकर | ११ |
| अनुवादित कविता | – अनुवाद – स्वप्ना लाड | १४ |
| जगणे | – नम्रता सरोदे | १५ |
| ग्रंथ परीक्षण – मीच अपराधी | – ग्रंथ परीक्षण : मनुजा सावंत | १५ |
| तरीही मी लिहत राहणार.. ! | – हेमंत दिनकर सावळे | १६ |
| पत्र एक आनंदी ठेवा | – शुभांगी ओतूरकर | १७ |
| संकलित कविता | – शुभम गायकवाड | १८ |
| नवे (कविता) | – रजनी तांबे | १९ |
| दवबिंदु (कविता) | – रजनी तांबे | १९ |
| सुविचार | – संकलन – चंद्रकांत तांबे | १९ |
| शिरपाची गोष्ट (कथा) | – प्रकाश फडणीस | २० |
| ती | – हेमंत दिनकर सावळे | २२ |
| अग्निशिखा | – अनघा काकडे | २५ |
| जगुन घ्या... | – केतन गेनबा लावाडे | २८ |
| क्षण... | – पूनम गांजाळे | २८ |
| धास्ती | – समीर गायकवाड | २९ |
| आयुष्याच्या गोष्टी – | – शुभांगी बोयने | ३० |
| शिक्षणविषयक विचार | – शीला राजेश राहेरकर | ३० |




|| वाङ्मयवाणी ||

# संपादकीय...

एम ए भाग १ (मराठी) वर्गातील विद्यार्थ्यांच्या वतीने ही गृहपत्रिका संपादित होत आहे. विद्यार्थ्यांना स्मरणिका आणि गृहपत्रिका संपादन हे विषय आम्ही अभ्यासक्रमात समाविष्ट केले होते. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी गृहपत्रिका संपादित करावी अशी कल्पना पुढे आली. आणि मग वर्गातील प्रत्येकाने आपापल्या परीने यात सहभाग घेण्याचे ठरवले. ही गृहपत्रिका हा विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराचा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. आपल्या सर्वांना ही गृहपत्रिका आवडेल अशी आशा आम्ही व्यक्त करतो.आपल्याला याविषयी काही अभिप्राय व्यक्त करायचा असेल तर आपण ma_marathi@moderncollegepune.edu.in यावर पाठवावा.

डॉ. वैजयंतीमाला जाधव,
समन्वयक, पदव्युत्तर विभाग

## विद्यार्थ्यांचे मनोगत

**(प्रातिनिधिक)**

यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महार्णवे।
समेत्य च व्यपेयातां कालमासाद्य कश्चन्।।

*रामायणातील या श्लोकाचा अर्थ असा आहे,की अथांग महासागरात तरंगणाऱ्या दोन ओंडक्यांप्रमाणे दोन व्यक्ती काही काळासाठी एकत्र येतात, अल्पकाळ एकत्र प्रवास करतात, आणि पुन्हा विलग होऊन आपापल्या दिशेने निघून जातात.*

*एम. ए. मराठीच्या या सत्राला प्रवेश घेणारे आम्ही सर्व ३० विद्यार्थी देखील दिल्लीपासून हैद्राबाद पर्यंत विखुरलेले होतो, आणि या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने एकत्र आलो आहोत. २ वर्षांच्या अल्प काळानंतर आम्ही पुन्हा एकदा निरनिराळ्या मार्गाने निघून जाऊ!*

*पण २ वर्षे एकत्र मार्गक्रमण करताना आम्ही खूप काही शिकणार आहोत, आमच्या गुरुजनांकडून आणि एकमेकांकडून सुद्धा!*

*या कोरोनाकाळातही आम्हाला ही शिकण्याची संधी देणाऱ्या इंटरनेट आणि गुगल, मायक्रोसॉफ्ट सारख्या या नवतंत्रज्ञानाचे आम्ही मनापासून आभारी आहोत. आज या तंत्रज्ञानाचा वापर करूनच आम्ही आमच्या मराठी विभागाची एक छोटेखानी गृहपत्रिका सादर करत आहोत. आमच्या या ३० जणांच्या गटात दडलेले अनेक कलाकार या निमित्ताने व्यक्त झाले आहेत. कुणी कवी, तर कुणी चित्रकार आहेत, कुणी सुविचार सादर केले आहेत, तर कुणी वैचारिक लेख लिहिले आहेत. आमचे दिव्यांग विद्यार्थी देखील यात उत्साहाने सहभागी झाले आहेत.*

*मला खात्री आहे, की ज्यांनी या पत्रिकेत पाहिल्यांदाच लेखन केले असेल, ते हा वसा सोडणार नाहीत, व उत्तरोत्तर लिहिते होतील.*

*या गृहपत्रिकेसाठी लेखनाला प्रवृत्त करणाऱ्या आमच्या गुरु डॉ. वैजयंतीमाला जाधव यांनीच याची तांत्रिक बाजू देखील सांभाळली असून त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.*

– उमा रायकर



|| वाङ्मयवाणी ||

# तपश्चर्या

पूजा गोतारणे

परवा routine check up साठी हॉस्पिटलमध्ये गेले. पुण्यातल्या या multispeciality हॉस्पिटलमध्ये १० वर्षे काम करून मग मी voluntary retirement घेऊन निवांतपणाने दिवस घालवत होते. इथे येण्याचं एक महत्वाचे कारण म्हणजे माझी जिवलग मैत्रीण सुधा; फोनवर तर गप्पा होतंच होत्या, पण प्रत्यक्ष भेटून गप्पा मारण्यासारखे सुख कशातच नाही. तिला आधीच कळवून ठेवले असल्यामुळे तिनेही जेवणाच्या सुट्टीचा वेळ माझ्यासाठी राखून ठेवला होता. जशी ह्या ऑफिस मध्ये कामाला रुजू झाले तेव्हापासूनच तिने मला खूप मदत केली अगदी सगळ्या डिपार्टमेंट ची कामे समजावून सांगण्यापासून ते कुठले डिपार्टमेंट कुठे आहे व कशाप्रकारे काम करायचे सगळे तिने नीट समजावून सांगितले, ती खरे तर माझी senior पण कायम तिने मला तिच्या मैत्रिणीप्रमाणे समजून घेतले. स्वभावाने मनमिळाऊ, प्रेमळ जरी ती असलीना तरी पण खूप स्वाभिमानी आणि करारी.

५-६ महिन्यातच आम्ही दोघी खूप चांगल्या मैत्रिणी झालो. सगळीकडे कायम आम्ही बरोबर असायचो. मनातील सुख दुःखे हि एकमेकांशी share करायचो. एकदा बोलता बोलता तिने सांगितले होते साताऱ्याकडे एका गावांमध्ये ती लग्न होऊन गेली, मुळची पुण्याची, त्यामुळे एका गांवात गेल्यावर सुरुवातीला त्रास झाला, पण तरीही नवऱ्यावरील प्रेमामुळे तिने तेही निभावले. लग्नानंतर काहीच दिवसात नवऱ्याने सांगितले कि आता फक्त घरात लक्ष द्यायचे काही गरज नाही नोकरीची, मला तुझ्या पैश्याची गरज नाही. पण गरज म्हणून नव्हे तर तिला आवड म्हणून नोकरी करायची होती, स्वावलंबी बनायचे होते. अशातच तिला मुलगा झाला आणि मग मात्र तिने नवऱ्याकडे नोकरीच्या परवानगीसाठी तगादा लावला. त्यातच तिच्या नवऱ्याची बदली पुण्याला झाली. सुधा फारच खुश झाली. दोघेही मुलाला घेऊन पुण्यात आले. नवरा ऑफिसला गेल्यावर हि देखील मुलाला घेऊन नोकरी शोधायला निघायची. ६ महिन्यांच्या अथक परिश्रमानंतर तिला इथे या हॉस्पिटल मध्ये clerk म्हणून नोकरी मिळाली. नवऱ्याला कळताच त्याने अकांड तांडव केले व ''तू नोकरी शोधली आहेस आता तुझे तू कसेही कर. तुझी आणि तुझ्या मुलाची जबाबदारी तुझी, माझ्याकडून कुठल्याही मदतीची अपेक्षा करू नकोस.'' अशी ताकीद वजा धमकी त्याने दिली. हिने ही challenge म्हणून ते स्वीकारले. मग २ वर्षाच्या पोराला पाळणाघरात ठेऊन रोज ९:०० वाजता ऑफसमध्ये ती यायची आणि संध्याकाळी ४:०० नंतर त्याला घेऊन घरी जायची. संध्याकाळी नवरा मुद्दामून तिला स्वयंपाकात वेगवेगळे पदार्थ बनवायला सांगत असे, कधी भाजी, सूप, चटणी आणि अजून बरेच काही .... पण हीच निश्चय दृढ होता, ती अजिबात डगमगली नाही. पाळणाघरात मुलाला सोडताना तिचा ऊर मायेने भरून यायचा, पण ती स्वतःला आवरायची आणि कामात गढून जायची.

कामात प्रामाणिक असल्यामुळे तिने ६ वर्षांमध्येच account head म्हणून स्थान मिळवले. आता तर मुलगाही मोठा, कळता झाला होता, पण वडिलांमुळे तो हि सतत तिला, ''तू माझ्याकडे लक्ष देत नाहीस'' असे ऐकवत असे आणि याच गोष्टीचे तिच्या मनात खूप दुःख होते. तिला गाडी चालवता येत नव्हती त्यामुळे तिला हॉस्पिटल खूप लांब पडत असे. तिने जिद्दीने गाडी शिकली, परवाना काढला, एवढेच काय पण गाडी शोरूम मधून आणायला देखील ती एकटी गेली. मुलगा व नवरा दोघेही फक्त तिला आणि तिच्या नवीन गाडीला बघत राहिले. नवऱ्याचा विरोध जरी मावळला असला, तरी पण साथ द्यायला काही तो तयार नव्हता आणि आता तिलाही तशी गरज वाटत नव्हती. संसारातील व कामावरची सर्व कामे ती चोख निभावत होती, पण मुलाने एकदा तरी



।। वाङ्मयवाणी ।।

आपल्याबद्दल प्रेमाने बोलावे असे तिला वाटत होते हे तिच्या बोलण्यातून सतत जाणवत असे आणि मी मात्र त्याला एक दिवस नक्की कळेल असे सांगून तिला धीर देत असे.

कालच तिचा वाढदिवस झाला तिला फोन केला तर म्हणाली कि, उद्या भेट तुला एक खूप महत्वाची गोष्ट सांगायची आहे. मला तर कधी तिला भेटते असे झाले होते. मी कॅन्टीनमध्ये तिची वाट बघत बसले होते. कॅन्टीनमध्ये मला बघून तिने मिठीच मारली आणि ओरडलीच ''रमा आज मी फारच खुश आहे ग !''; मी म्हणाले ,''अगं हो, माहिती आहे, बाईसाहेबांचा काल वाढदिवस होता पण काल एवढे झाले तरी काय? काल सकाळपासून तुझ्या आवाजामध्ये कमालीचा उत्साह जाणवत होता. काही special,?''

''अगं हो ग ? मुलाने काल मला घट्ट मिठी मारली व म्हणाला, ''आई तू खूप कष्ट केलेस ग माझ्यासाठी सॉरी मला खूप उशिरा जाग आली. '' आणि हो नवऱ्याने छान गुलाबाचे फुल हातात आणून दिले. ''खरंच रमा मी भरून पावले ग !''; तिच्या डोळ्यातील आनंदाश्रू थांबतच नव्हते आणि माझ्याही...

आज माझ्या मैत्रिणीच्या तपश्चर्येचे फळ तिला मिळाले होते.

❁❁❁

## मला ना...

आनंद सापडायचा किंवा मग
तडफडत रहायचे त्या आनंदासाठी.
त्या आनंदा च्या समाधानासाठी.....

जिंदगी मुरंबा आहे, मला त्यात मुरण्याचे आहे.
तिच्यात गोडवा वाढवायचं स्वत: चा...
मी त्या दोन रेषा आहे ना ओठांच्या त्यांना आपोआप खुलायची.

वेड व्हायचे ! खुश व्हायचे !

आनंदी राहायचे, आनंदी जगण्यासाठी रहायचे.
आनंद वाटायचा, आनंदी राहायचे.

बहारदार, शानदार,
जोरदार आयुष्य जगण्याचा प्रयत्न करत रहायचे...

**– पूजा सुरेश पवार**

## श्रम

श्रम शारीरिक असो वा मानसिक
श्रमाला दुसरा पर्याय नाही
जीवन हे उत्तम जगण्या
श्रमाशिवाय दुसरा विकल्प नाही

गरीबी हा काही कलंक नाही
श्रीमंती काही विभूषण नाही
जो करतो श्रम जीव ओतून
उद्धार झाल्याशिवाय रहात नाही

श्रम असो हे कुठलेही
कमीपणा त्यात नको
चालते ज्यामुळे तुमची जीविका
अपमान त्याचा व्हायला नको

श्रमाने होते शरीर धष्टपुष्ट
बुद्धीचा होतो आपल्या विकास
सकारात्मक विचार येती मनी
जीवनाचा होतो सर्वांगीण विकास

जीवन सत्कर्मी लागाया
श्रम आहे महत्वपूर्ण
परोपकार असावे जीवनाचे ध्येय
श्रमाचा वाटा गौरवपूर्ण...

**– कु. केतन गेनबा लावाडे**

# सावधान आपलं हवामान बदलतंय...

श्वेता संतोष शेटगावकर

माणूस जसा जसा प्रगती करतोय तसाच तो अधोगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. माणसाने जरी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात कितीही प्रगती केली तरी माणूस निसर्गचक्र काही बदलू शकत नाही. वातावरण झपाट्याने बदलत आहे. पृथ्वीचे वाढते तापमान, वाढते प्रदूषण, अवेळी येणारा पाऊस, चक्रीवादळ, हिमनद्यांचे वितळणे हे वेगाने होत आहे. आणि ह्याचा परिणाम निसर्गाच्या इतर घटकावर तसेच माणसावर सुद्धा होत आहे.

२३ मार्च हा दिवस जगभरात 'जागतिक हवामानशास्त्र दिन' म्हणून साजरा केला जातो. हवेचे तापमान, वातावरणातील दाब, वाऱ्याची गती व दिशा यांच्या परस्पर संबंधातून निर्माण होणारी वादळे, ढग, पाऊस, विजांचा कडकडाट आदी घटनांची कालमानानुसार बदलणाऱ्या वागणुकीचा अभ्यास करण्याच्या शास्त्राला हवामान शास्त्र असे म्हणतात.

आपल्या हवामानात होणार बदल हा चिंतेचा विषय बनला आहे विकासाच्या नावाने केलेली निसर्गाची छेडछाड भयानक आहे. औद्योगिकीकरणाला चालना देण्यासाठी प्रदूषणकारी कारखाने सुरू करायला संमती दिली जाते. त्यातून तयार झालेल्या कचऱ्यातून हवा, वायू, जल आणि आपल्या पर्यावरणाला धोका निर्माण होतो. आणि नवीन समस्या निर्माण होतात. हवेच्या प्रदूषणाचा विचार केला तर जगातल्या पहिल्या वीस शहरातली १५ शहरे भारतात आहेत. पावसात औद्योगिक वसाहतीतला कचरा पाण्याबरोबर वाहत जावून आसपासच्या परिसरातील विहिरी, तलाव यांना दूषित करत असतात. भारताला स्वतंत्र होवून आज ७४ वर्ष झाली तरी सुद्धा ६०% घरात नळाची जोडणी नाही.

गंगा नदी प्रदुषणमुक्त करण्यासाठी केंद्र सरकारने 'नमामी गंगे' या मोहिमेची सुरुवात केली. मात्र अजूनही गंगा नदी प्रदूषित आहे. तसेच यमुना, साबरमती, ब्रह्मपुत्रा, गोमती या भारतातील प्रदूषित नद्या आहेत. आपल्या देशात नद्यांना मातेचा दर्जा दिला जातो त्या मातांचा श्वास प्रदूषणामुळे गुदमरतोय. पाण्यातील जीवावर प्रदूषणाचा परिणाम होत आहे. आपल्या घरात कितीतरी टाकावू वस्तू असतात उदा. मोडलेली खेळणी, खराब पेन, काचेच्या बाटल्या, अल्युमिनियम फॉइल, जंतुनाशके, कीटकनाशके, यासारख्या कचऱ्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

मागच्या दोन – तीन वर्षातील घटना ह्या माणसाला सुधारण्यासाठी दिलेले संकेत आहेत. सतत बसणारे भूकंपाचे धक्के, वेळी अवेळी येणारा पाऊस, वाढते तापमान, हिमनगाचे कोसळणे, वितळणे, चक्रीवादळे, यातून माणसाने शिकले पाहिजे. पाण्याची नासाडी अन्नाची, झाडांची कत्तल थांबवली पाहिजे. पर्यावरणाची काळजी घेणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. कचरा इकडे तिकडे न फेकता तो कचरा पेटीत टाकावा. प्लॅस्टिकच्या कचऱ्याला आग न लावता तो कचरापेटीत टाकावा म्हणजे त्याच्यावर योग्य ती प्रक्रिया होवून ते प्लास्टिक परत वापरत येईल. शक्यतो प्लॅस्टिकच्या बाटल्या पिशव्या यांचा वापर करु नये त्या एवजी तांब्याच्या बाटल्या तसेच कापडाच्या पिशव्यांचा वापर करावा. शेवटी आपण सुद्धा निसर्गाचा भाग आहोत निसर्ग आहे तर आपण आहोत.

अपूर्वा कांबळे





।। वाङ्मयवाणी ।।

# संस्कार श्रेष्ठ

अपूर्वा कांबळे

'शिक्षणापेक्षा संस्कार मोठे' ; इथे मला असे म्हणायचे आहे कि, आपण शिक्षणाला तर अफाट महत्त्व देतच आहोत, तसेच आपल्या भारतीय संस्कृतीला, आपल्या संस्कारांना पण अधिक महत्त्व द्यायला शिकलं पाहिजे. आजकाल बहुतेक जण आपले संस्कार विसरत चालले आहेत.

संस्कार म्हणजे गुणांचा गुणाकार आणि दोषांचा भागाकार, गुणाकार या अर्थाने स्वतः मधील गुण वाढवायचे आणि दोषांचा भागाकार याचा अर्थ स्वतः मधील दोष अल्प करायचे. विचार व कृती चांगल्या होण्यासाठी संस्कारांची गरज असते. संस्कार हे कोणावर कधीच लादता येत नाहीत किंवा पास अथवा रिजेक्ट लेबल सारखे चिटकवता येत नाहीत. संस्कार दिले जातात आणि ते योग्य रितीने घेतले जातात. असा संस्कारांचा वसा पिढी दर पिढी चालू असतो. पण मुळातच ज्या व्यक्तीवर हे संस्कार होतात ती व्यक्ती पुढे जाऊन याला किती महत्त्व देते यावरून त्या संस्कारांची व्याख्या नेहमीच बदलत असते. कालमानानुसार संस्कार बदलत जातात. शंभरवर्ष पूर्वी केले जाणारे संस्कार कालानुरूप बदलले, तर काही संस्कार सततच्या बदलत्या परिस्थितीत देखील काळाच्या कसोटीवर खरे उतरते. माणुसकी, प्रेम, दया, भक्ती, आपुलकी आणि त्याग, हे संस्कार काळातील ठरले आणि ज्या संस्कारांचा उगम दररोजच्या जगण्याच्या प्रक्रियेतून झाला ते संस्कार व्यक्ती आणि समाजानुरूप बनले आणि वेळोवेळी बदलले ही गेले. संस्कार देणे ही प्रोसिजर नसून ती अव्याहतपणे घडत राहणारी प्रोसेस आहे. यात आजूबाजूच्या वातावरणाचा खूप प्रभाव पडतो. आपल्या मुलांच्या शाळेत, मित्रांबरोबर नातेसंबंधातून, आजूबाजूच्या समाजामधून त्यांच्यावर कळत नकळत बरे वाईट संस्कार होतच असतात.

पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती, त्यामुळे कुटुंबातील थोरांकडून मुलांवर संस्कार होत होते. घरात एक आदर्शवंत व्यक्ती असायची. त्यांच्या आज्ञेबाहेर कोणी वागत नसे, त्याने जाब विचारल्यास कोणी उद्धट बोलत नसे. परंतु आज विभक्त कुटुंब पैसे कमविण्याच्या नादात आपल्याच मुलावर संस्कार करण्यात उदासीनता दाखवित असल्यामुळे, आजची तरुणाई भरकटत आहे. आई वडील कामावर जात असल्यामुळे कुटुंबातील संवादच नष्ट झाला आहे. पैशाच जास्त महत्त्व आले आहे. त्यामुळे आई-वडील मुलांना वारेमाप पैसे, मागेल ती वस्तू देऊन त्यांना खुश करण्याचा प्रयत्न करतात. यावरून इथे मला स्वानुभवातून एक घटना सांगावीशी वाटते ...

मध्यंतरी मी एका शाळेमध्ये शिकवत होते. तिथे एक चार वर्षाचा मुलगा होता. त्याला कशामध्येही उत्सुकता किंवा कुतूहल असं वाटत नव्हतं. एरवी लहान मुलं कशी खेळकर, शांत न बसणारी, इकडून तिकडे मस्ती करणारी, काही ना काही सतत विचारत राहणारी, कुतूहलाने पाहणारी, सगळ्याच गोष्टींमध्ये आवड घेणारी विशेष म्हणजे कधीही न थकणारी, उत्साही प्रवृत्तीची असतात. पण मला भावेषला पाहून थोडं आश्चर्यच झालं. एकदम गप्प व एकटाच रहायचा, कोणामधे मिसळत नव्हता. त्याला कशामधेही आवड किंवा उत्साह नव्हता. राग मात्र पटकन यायचा, मला त्याचं वाईट वाटू लागलं होतं म्हणून मी त्याच्या पालकांशी भेटले, त्यांच्याशी संवाद साधला. तेव्हा माझ्या लक्षात आलं कि या मुलाला कोणत्याही वस्तूची किंमत नाही, कारण त्याला सर्व काही वेळेच्या अगोदर मिळालेला आहे. त्याचे पालक त्याला वेळ देऊ शकत नव्हते पण, त्यांना जेव्हा मी समजावलं की कशामुळे भावेष असा वागतो, त्यांनी काय करायला हवं त्यानंतर त्यांना ते पटलं.

हळूहळू त्या मुलांमध्ये फरक जाणवला. तोही इतरांसारखा खेळू लागला व शाळेत चांगलाच रमला. आश्चर्य म्हणजे रविवारीही येऊन शाळेत बसायची इच्छा प्रकट करू लागला.

असंच एकदा मी बाजारात गेले होते, तर तिथे एक



।। वाङ्मयवाणी ।।

मुलगा आपल्या आईबरोबर उभा होता. ही दिल्ली मधील घटना आहे.....

तो मुलगा बिचारा इकडे तिकडे बघत होता आणि त्याची आई सिगारेट फुंकत फोनवर बोलत होती. हे बघून मला एका क्षणासाठी कसंतरी झालं. त्या बाईचा रागही भरपूर आला होता; अरे, त्या बालमनावर कसले संस्कार होतायेत.... किती भयंकर परिस्थिती आहे ही. हे कुठेतरी थांबायला हवं, त्या कोवळ्या मनाची काय घालमेल झाली असेल. याचा विचार नक्कीच केला पाहिजे.

शिवाय इथे महाविद्यालयाच्या तरुण-तरुणींचे जी दृष्ये पहायला मिळतात ,ते पाहून तर प्रचंड राग येतो व दुःख ही खूप होतं..... की आजची तरुण पिढी अशी का होतं आहे. स्वतःच्या जीवाची, भविष्याची आणि पालकांची कसलीही चिंता किंवा भीती त्यांच्या मनात नाही. आज आपण म्हणतो कि मुलगा आणि मुलगी यांना समान हक्क मिळाला पाहिजे, हे बरोबर ही आहे. पण आजची तरुण पिढी याचा गैरफायदा करून घेत आहे. विशेषतः शहरी भागामधे हे जास्त आढळून येतं. केवळ स्वतःची मौज मस्ती म्हणून काहीही केलं तर ते योग्य नाही. याचा विचार सगळ्यांनीच केला पाहिजेत. मुलांनी तसेच पालकांनी ही या समस्येचा गंभीरपणे विचार करायला हवा. एक दुसऱ्यासाठी वेळ काढायला हवा. संवाद साधला पाहिजे, काही समस्या असतील तर त्यांचे निवारण आपण कसे करू शकतो, याकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे.

या सगळ्या विचारानंतर मला असे वाटते की संस्कार हे खूप महत्त्वाचे आहेत कारण, त्यातूनच आपण बहुमूल्य ज्ञान प्राप्त करत असतो.

हीच वास्तविकता आहे! याचा विचार आता नाही केला तरं, नंतर फारच विकट परिस्थिती उत्पन्न होईल. कुणाला माझे विचार पटले नाही तरं क्षमस्व.

धन्यवाद !

## मज वाटे पुन्हा लहान व्हावे!

मज वाटे पुन्हा लहान व्हावे
बालपणीच्या त्या दिवसात रमून जावे ।।
काचाकवड्या लंगडीपाणी
अपारप्पी आणि शिवणापाणी

सख्यांबरोबर अंगणात खेळावे मज वाटे पुन्हा लहान व्हावे ।।१।।
भातुकली आणि इसापनीती सख्यांसोबत कानगोष्टी
सांजवेळी शुभंकरोती
झोपताना आजीच्या रंजक गोष्टी मज वाटे पुन्हा लहान व्हावे ।।२।।
नव्हते ठाऊक भ्रमणध्वनी आणि संगणक,
अभ्यासासाठी होते पाटी आणि पुस्तक
ती मजा काही औरच होती मज वाटे पुन्हा लहान व्हावे ।।३।।
पाढे पाठ करून घेणारे बाबा
मायने हात फिरवणारी आई फिरायला नेणारे आजोबा आणि उठाबशा काढायला लावणाऱ्या बाई
मज वाटे पुन्हा लहान व्हावे ।।४।।
आठवणी स्मरता मन आनंदी होते माझ्या चिमुकल्यांमध्ये मी रमून जाते
झुक झुक गाडीत बसून मामाच्या गावी जावे
मज वाटे पुन्हा लहान व्हावे बालपणीच्या त्या दिवसात रमून जावे ।।५।।

**पूजा किशोर वाडेकर**



।। वाङ्मयवाणी ।।

## आठवणीतले दिवस

तासंतास तूमच्या सोबतं बोलत बसणं
आज ही आठवत मला.....
कित्येकदा मनातील शंकाना दूर केलतं तुम्ही!
गोंधळलेल्या मनाला शांत केलतं तुम्ही!!
कधी माझी जीवलग 'मैत्रीण' बनून तर,
कधी माझी 'आई' बनून
योग्य गोष्टी समजवल्यात तुम्ही!
संमेलनाचे ते तीन अविस्मरणीय दिवस...
आज ही आठवतात मला....
''पेन कधी ही थांबवू नको बाळ'';
या शब्दानी मला नेहमी प्रोत्साहीत केलं.
आज ही आठवतं मला.....
आणि आता इतक्या वर्षांनी
''तू लिही मी वाचक आहे''
या बहुमुल्य शब्दांनी तर, मला पुन्हाः स्फूर्ती आली
अन् माझे डोळे पाणावले....
अशा या माझ्या ''गुरुमाऊलीला''
माझा साष्टांग दंडवत.

**अपूर्वा कांबळे**

## ...होऊ नये!

(वृत्तः मंदाकिनी-गागालगा x४)

मधुपर्णिकेचा रंग फुलतांना फिका होऊ नये,
फुलल्याविना कुठल्या कळ्यांची वाटिका होऊ नये!

होतील कविता भावनेच्या भूमिकेवर पालथ्या,
अव्यक्त कुठल्या कल्पनेची नाटिका होऊ नये!

झाली कुठेही जर चुकी; व्हावे सुधारुन मोकळे,
एकेक करतांना चुकांची मालिका होऊ नये!

जगण्यास या थोडी तरी किंमत मिळाली पाहिजे,
आयुष्य हे मूल्यांविना न्यग्रोधिका होऊ नये!

या जीवनावर आजवर झाल्या किती लिहुनी कथा,
आता विनंती एवढी; आख्यायिका होऊ नये!

श्रीकृष्ण झाला जर कधी प्रेमी तरीही चालतो,
कुठल्याच केवळ प्रेमिकेची राधिका होऊ नये!

**अविनाश काठवटे**

### काही विचार

१. जगात अनेक व्यक्ती भेटतात. पण ते कधीच आपले नसतात .आपला मार्ग स्वतः शोधला पाहिजे.
२. हक्काचा माणूस असणे गरजेचे असते. पण तो खराच आपल्या हक्काचा आहे का ? हे समजणे तेवढेच महत्त्वाचे असते.
३. एकटे असतात ते चांगले असते. कोणाचा जीवनाची माहिती नसते म्हणजे स्वतःचे जीवन सुखी असते.
४. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर नवीन गोष्टी समजतात. पण त्यातून शिकवण आपणच घेवू शकतो.
५. अपेक्षा हा प्रत्येक व्यक्ती करतो .पण त्याला मर्यादा ठेवणे हे ही ,त्या व्यक्तीच्या हातात असते.
६. प्रेम करणे सोपे असते .पण ते पूर्ण करणे कठीण असते.

**– मनुजा सावंत**

### विनोद

गायीच्या पोटात तेहतीस कोटी देव आहेत हे जरी खरे मानले, तरी येता– जाता तिच्या पोटाला हात लावून सारखा नमस्कार करू नये, तिला गुदगुल्या होतात..

कोलगेट : क्या आपके टुथपेस्ट मे नमक है?
पुणेकर : नाही मी वरतुन टाकुन घेतो.. (चवीनुसार)
कोलगेट वाल्याने स्वत:च्या थोबाडीत मारुन घेतल्या.

**– पूजा वाडेकर**



|| वाङ्मयवाणी ||

# पद्मश्री दीपशिखा

उमा रायकर

भारतातील सर्वोच्च नागरी पद्म पुरस्कार हे १९५४ पासून देशातील मान्यवरांना त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण आणि उल्लेखनीय कार्याबद्दल दिले जात आहेत. भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला जाहीर होणाऱ्या या पुरस्कारांमध्ये यंदा १०२ पद्म पुरस्कार विजेते असून त्यात २८ स्त्रियांचा समावेश आहे. या सर्व २८ स्त्रियांचा थोडक्यात परिचय मी या लेखातून करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

त्या सगळ्यांत वयाने वरिष्ठ आहेत आर पापाम्मल. यांचं वय एकशे पाच वर्षे आहे. १९१४ मध्ये तामिळनाडू मधल्या देवपूरम गावात जन्मलेल्या पापाम्मल यांना शालेय शिक्षण मिळालं नाही, परंतु धडाडीने कुटुंबा कडील शेती केली. शेती करताना रासायनिक खतांचे दुष्परिणाम पाहिल्यानंतर त्या सेंद्रिय शेतीकडे वळल्या. आतापर्यंत त्यांनी सेंद्रिय शेतीचे इतके प्रयोग आपल्या शेतामध्ये केले आहेत, की त्या अतिशय तज्ञ झाल्या आहेत. एकशे पाच वर्षांच्या असूनही अजून त्या शेतात काम करतात. तिथल्या कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनाही त्या शिकवतात. अजूनही त्या मातीच्या भांड्यात शिजवलेले अन्न केळीच्या पानावर जेवतात.

दुसऱ्या कर्तृत्ववान महिला आहेत आसामच्या बिरूबाला राभा. आसाममधल्या गोलपारा जिल्ह्यामध्ये यांचा जन्म झाला होता. यांना स्वतःला चेटकीण समजुन यांच्या गावांमधून भयानक छळाला सामोरं जावं लागलं होतं. २००० सालापासून त्यांनी चेटकीण प्रथेला विरोध करायला सुरुवात केली. चेटकीण समजून ज्या ज्या बायका–पुरुषांची हत्या होण्याची भीती असेल, त्यांना वाचवण्यासाठी त्या धावून जातात. त्यांच्या अथक प्रयत्नांचा परिणाम म्हणून २०१५ साली आसाममध्ये 'चेटकीण हत्या प्रतिबंधक कायदा' पास करण्यात आला. आतापर्यंत त्यांनी चाळीस जणींना मरणापासून वाचवले आणि शंभरहून जास्त स्त्रियांचे पुनर्वसन केले आहे. त्यांनी २०११ साली 'मिशन बीरूबाला' नावाची संस्था सुरू केली आहे. आसामात दरवर्षी किमान १२ ते १५ जणांना डाकीण समजून ठार केले जात होतं, आता ती परिस्थिती हळूहळू बदलण्यात यांचा मोठा सहभाग आहे.

तिसऱ्या कर्तबगार महिला आहेत शान्ति देवी. यांचा जन्म १९३४ सालचा आहे. त्या ओरिसा मधल्या कोरापूत जिल्ह्याच्या रहिवासी आहेत. १९५१ मध्ये विनोबा भावे भूदान चळवळीसाठी ओरिसा मध्ये आले असताना त्यांच्याशी भेट झाली. त्यानंतर त्यांनी कोरापूत मधल्या जमीन सत्याग्रह आंदोलनाचं नेतृत्व केले,भूदान चळवळ थंडावली तरी त्या स्वस्थ बसल्या नाहीत. त्या सेवासदन नावाची संस्था सुरू करून कोरापुट जिल्ह्यामध्ये अजूनही समाजकार्य करत आहेत.

झारखंडच्या छुटनी देवी यांनाही १९९९ मध्ये गावकऱ्यांनी चेटकीण ठरवून अतिशय छळ केला होता. परंतु त्याच काळात त्यांनी धडा घेतला की, ज्यांना चेटकीण ठरवून मारहाण केली जाते, त्या स्त्रियांना त्यांचे कुटुंब किंवा समाज मदतीचा हात देत नाही. त्यांच्याबरोबर त्यांचा नवरा तरी होता, परंतु अनेक स्त्रिया फार एकट्या पडतात. त्यांनी झारखंडमध्ये 'आशा' नावाच्या संस्थेमध्ये सामील होऊन अशा स्त्रियांसाठी समाज कार्य सुरू केले. आता त्यांच्याबरोबर ६२ स्त्रिया चेटकिणीच्या कलंकातून मुक्त होऊन समाजकार्य करत आहेत.

आसाममधल्या गोल्हाट जिल्ह्यामध्ये १९४९ साली जन्म झालेल्या लखमी बारुआ यांचे १९७३ मध्ये लग्न झाल्यानंतर त्या बँकेत नोकरी करू लागल्या. त्या दरम्यान त्यांनी खूप वेळा पाहिलं की बँकेमध्ये येणाऱ्या अशिक्षित स्त्रियांना बँकेचे व्यवहार कळत नसत, त्यामुळे त्यांचा खूप वेळ जायचा, नुकसान व्हायचं. हा प्रश्न मनाला भिडला आणि याच प्रश्नावर त्यांनी काम करायचं ठरवलं. त्यांना लक्षात आलं की ज्या स्त्रियांकडे तारण ठेवायला जमीन किंवा दागिने नसतात, अशांना कोणी कर्जही देत नाही. मात्र त्यामुळे त्या महिलांना प्रगतीच्या सर्व वाटा बंद होतात. त्यासाठी त्यांनी स्वतःच एक बँक सुरू करायचं



|| वाङ्मयवाणी ||

ठरवलं. त्यामुळे त्यांनी १९८३ मध्ये एक महिलांची समिती स्थापन केली, १९९० मध्ये कोनोकोलोता महिला सहकारी बँक स्थापन केली आणि १९९८ मध्ये ती बँक रजिस्टर झाली. 2000 साली त्यांना व्यावसायिक कामाचा परवाना मिळाला. आणि त्यानंतर त्यांनी आसाम मध्ये अनेक गरजू बायकांना कर्ज देऊन त्यांच्या समाजकार्याला सुरुवात केली. महिलांनी स्वयंपूर्ण आणि अर्थसाक्षर व्हावे यासाठी त्यांनी भरपूर काम केलेले आहे.

मणिपूर इथल्या हंजबम राधे देवी या मणिपुरी वधुचा पोशाख म्हणजेच पोटलोई डिझाइन करतात. त्या जणू काही मणिपुरी फॅशन डिझायनरच आहेत. मणिपूरच्या थोबाल जिल्ह्यामध्ये त्या व्यवसाय करतात. मणिपुरी हिंदू मेईतेई समाजामध्ये लग्न होताना वधू हा पोशाख परिधान करते. पोशाख बनवण्यासाठी १५ ते २० दिवस लागतात आणि त्यामध्ये अतिशय मेहनतीची कारीगरी आहे. त्यांनी ज्या वेळेस या कामाला सुरुवात केली त्या वेळेला पूर्ण मणिपूरमध्ये यांच्यासारख्या फार कमी महिला हे काम करत होत्या. आता त्यांनी अनेक बायकांना यामध्ये प्रशिक्षण दिले आहे आणि स्वतःचा व्यवसाय सुरू करायला उत्तेजन दिले आहे.

कर्नाटक संगीत गायिका बॉम्बे जयश्री या चेन्नईच्या रहिवासी आहेत. सुरुवातीच्या काळात मुंबईत वास्तव्य असल्यामुळे त्यांना बॉम्बे जयश्री असं जे नाव मिळालं ते अजूनही कायम आहे. पंडित अजय पोहनकर यांच्याकडून त्यांनी प्रथम हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेतलं, परंतु कर्नाटक संगीत शिकण्यासाठी त्या चेन्नईत लालगुडी जयरामन यांच्याकडे आल्या. त्यानंतर संगीत साधना करताना अनेक चित्रपट गीते त्यांनी गायली, शास्त्रीय संगीताच्या मैफिली केल्या. 'लाईफ ऑफ पाय' या चित्रपटामधील एका गीतासाठी त्यांना ऑस्करचे नामांकन मिळाले होते.

आंध्र प्रदेशातल्या निदुमुल सुमथी या पहिल्या महिला मृदंग वादक आहेत. १९५0 साली पश्चिम गोदावरी जिल्ह्यामध्ये जन्माला आलेल्या सुमती यांचा पहिला मृदंग वादनाचा कार्यक्रम सहाव्या वर्षी झाला त्यांचे वडील निदुमल राघवय्या हेच त्यांचे पहिले गुरू होते. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. मृदुंग हे वाद्य पुरुषांचे वाद्य समजले जाते. या समजुतीला फाटा देत त्यामध्ये त्यांनी त्यात प्रावीण्य प्राप्त केले आहे.

बिहार मधल्या मधुबनी गावाच्या रहिवासी दुलारी देवी मधुबनी चित्रकलेसाठी प्रसिद्ध आहेत. लहान वयात लग्न झाले, पण लग्नानंतर सासरी होणाऱ्या छळामुळे त्या माहेरी परतल्या. धुणीभांडी करून चरितार्थ चालवताना एका घरातील कर्पूरी देवी या महिलेकडून त्या चित्रकला शिकल्या आणि प्रचंड मेहनत घेऊन त्यात प्रगती केली. १९९९ मध्ये त्यांना ललितकला पुरस्कार तसेच २०१२ मध्ये राज्य पुरस्कार देखील मिळाला. मधुबनी चित्रांद्वारे त्यांची आत्मकथा देखील पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आहे.

लिज्जत पापडच्या संचालिका जसवंतिबेन पोपट सध्या नव्वदीच्या घरात आहेत. १९५९ साली मुंबईतल्या गिरगावात त्यांच्यासारख्या सहा गृहिणींनी मिळून पापड उद्योगाला सुरुवात केली होती. तीन चार महिन्यातच त्यांच्याकडे २०० स्त्रिया काम करू लागल्या. आज देशभरामध्ये त्यांच्या ८१ शाखा सुरू असून आणि निर्यातही भरपूर होत असते. इथे काम करणाऱ्या स्त्रियांना जात विचारली जात नाही, सर्वधर्म प्रार्थना मात्र सक्तीची असते. त्यांच्या व्यवसायामध्ये ४३ हजार महिलांना रोजगार मिळतो. २४ देशांमध्ये ८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल त्या करत असतात. त्यांची संस्था पूर्णपणे सहकारी तत्त्वावर चालते.

अरुणाचल प्रदेशात राहणाऱ्या अंशू जमसेंपा यांचा जन्म १९७९ साली बोमडीला जिल्ह्यामध्ये झाला. त्या लहानपणापासूनच गिर्यारोहणाच्या चाहत्या आहेत. आतापर्यंत अनेक जणांनी एव्हरेस्ट सर केला असेल, परंतु पाच दिवसात दोन वेळा एवरेस्ट सर करणारी ती पहिली महिला ठरली आहे.

निरू कुमार या समाजकार्य करतात आणि डायव्हर्सिटी आणि इन्कलूजन कन्सल्टंट म्हणून काम करतात. डायव्हर्सिटी म्हणजे विविधता आणि इन्कलूजन म्हणजे समावेशकता असे आपण म्हणू शकतो. या संबंधात त्या फॉरचून ५०० कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत असतात. त्यांची स्वतःची 'आस्क इन्साइट' नावाची एक संस्था आहे.

क्रीडा क्षेत्रात प्रावीण्य मिळविणाऱ्या सुधा हरी नारायण सिंग या ॲथलेटिक्स खेळाडूला, टेबल टेनिस खेळणाऱ्या मौमा दास यांना, तसेच बास्केटबॉल खेळाडू

पी अनिता यांनाही पद्मश्री मिळालेली आहे.

पंजाब मधील फुलकारी ही पारंपारिक भरतकाम कला जोपासणाऱ्या लाजवंती या कलाकाराला पद्मश्री ने सन्मानित केले आहे .

मिझोराम मधल्या सांगखुमी बालछुआक या महिलांच्या हक्कासाठी साठी काम करतात.

पंजाबच्या प्रकाश कौर या स्वतः अनाथ होत्या. त्यांना त्यांच्या आईवडिलांनी अक्षरशः रस्त्यावर सोडून दिलं होतं. त्यांना स्वतःचे दुःख माहिती होतं आणि त्यामुळे अशाच पालकांनी सोडून दिलेल्या ८० मुलींच्या त्या पालक झाल्या आहेत. त्यांच्या या संस्थेत अशा अनाथ मुलींना घर मिळते.

पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यामध्ये गुरू मां कमली सोरेन या गेली तीस वर्षे आदिवासी तसेच वनवासी जमातीसाठी कल्याणकारी कार्य करत आहेत.

गोव्याच्या राज्यपाल, भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा राहिलेल्या मृदुला सिन्हा यांना मरणोपरांत पद्मश्री प्रदान करण्यात आली आहे.

तसेच १९७७ पासून राजकारणात कार्यरत असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या खासदार तसेच राज्यसभा सदस्य बिजया चक्रवर्ती या सध्या भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष आहेत. त्यांनाही पद्मश्री प्रदान केली गेली आहे.

ओरिसा मधल्या पूर्णमासी जानी या एक आदिवासी कवयित्री आहेत. अशिक्षीत असूनही त्यांनी एक लाखावर कविता आणि भक्ती गीते रचली आहे. सत्तर वर्षाच्या पूर्णमासी जानी यांना ताडीसरी बाई असेही नाव दिलेले आहे. त्यांची कीर्ती अशी आहे की त्यांनी आतापर्यंत एकाही गीताची पुनरावृत्ति केलेली नाही. त्यांची गीते जरी भरपूर असली तरी त्यापैकी केवळ ५००० गीते आणि कविता त्यांच्या चाहत्यांनी जतन केल्या आहेत.

माता बी मंजम्मा जोगती या कर्नाटकमध्ये पुरुष म्हणून जन्माला आल्या होत्या, पण वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी स्वतःला स्त्री म्हणून यल्लमा देवीच्या सेवेला समर्पित केले. त्यानंतर त्यांनी जोगती नृत्य, जानपद गीत तसेच अनेक कला प्रकारांमध्ये प्राविण्य मिळवले. कर्नाटक जानपद अकादमीच्या त्या पहिल्या लिंग परिवर्तित अध्यक्ष आहेत.

उत्तर प्रदेशच्या उषा यादव या साहित्यिक आहेत. कानपूर मध्ये त्यांचा जन्म झाला, परंतु लग्नानंतर आग्रा येथे वास्तव्य आहे. महिला आणि लहान मुलांसाठी त्यांनी शंभरहून अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यांना अनेक पुरस्कारही प्राप्त झालेले आहेत.

बांगलादेश संजीदा खातुन यांनाही या वर्षीच्या पद्मश्री पुरस्कार दिला गेलेला आहे. त्या तिथे महिलांसाठी कल्याणकारी योजना राबवत असतात.

मध्यप्रदेश मध्ये राहणाऱ्या भुरीबाई या भिल्ल जमातीतल्या कलाकार आहेत. मध्य प्रदेशातल्या झाबुआ जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला त्या लहानपणापासूनच चित्रकलेमध्ये रस होता, घरची गरिबी असूनही त्यांनी संधी मिळेल तेव्हा ही आवड जोपासली आणि मध्यप्रदेशच्या भिल्ल जमातीची ही खास कला जवळजवळ अस्तंगत होत चालली होती पण भुरीबाईंनी तिला पुनरुज्जीवित केलं आणि इतर अनेक बायकांना ती शिकवली. त्या कले चा पुन्हा एकदा नविन प्रवास चालू झाला.

पंजाब मधल्या लुधियाना येथे राहणाऱ्या रजनी बेक्टर यांचे नाव आता सर्वांनाच माहिती आहे. यांनी तीनशे रुपयांच्या भांडवलावर घरामध्ये सुरू केलेल्या क्रेमिका बिस्कीट कंपनीची १९९५ मध्ये वीस कोटींची उलाढाल होती. क्रेमिका आणि मिसेस बेक्टर असे दोन ब्रॅंड यांच्या नावावर आहेत. भारतातल्या बिस्कीट आणि केक च्या व्यवसायामध्ये १२ टक्के हिस्सा रजनी बेक्टर यांच्या कंपनीचा आहे.

आणि सगळ्यात शेवटचं नाव आहे सिंधुताई सपकाळ यांचं! सिंधुताई सपकाळ यांना कोण ओळखत नाही? पंचवीस तीस वर्षांपूर्वी त्यांच्या घरामधून, समाजामधून त्यांना अपार कष्ट आणि छळ सोसावा लागला. परंतु त्याची परतफेड मात्र त्यांनी समाजकार्याने केली आणि अनाथ मुलांना आधार देणारी निराधारांना मदत करणारी अशी संस्था त्यांनी सुरू केली आहे. पद्मश्री पुरस्कारासाठी त्यांची निवड ही अतिशय सुयोग्य आहे.

आतापर्यंत आपण अनेक पद्मश्री पुरस्काराने सन्मानित महिलांना आणि महिलांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतलेला आहे. हा आढावा आपल्या सर्वांनाच स्फूर्तीदायक ठरेल याची मला खात्री आहे.

## 'अनुवादित कविता

*I touch God in my song*
*as the hill touches the far-away sea*
*with its waterfall.*

*The butterfly counts not months but moments,*
*and has time enough.*

*Let my love, like sunlight, surround you*
*and yet give you illumined freedom.*

*Love remains a secret even when spoken,*
*for only a lover truly knows that he is loved.*

*Emancipation from the bondage of the soil*
*is no freedom for thee.*

*In love I pay my endless debt to thee*
*for what thou art.*

दूरवर असलेल्या सागराला टेकडी तिच्या धबधब्यातून स्पर्श करते जशी
अगदी तसाच मीही स्पर्शून जातो ईश्वराला माझ्या गाण्यातून .

फुलपाखरे क्षण मोजतात महिने नाही
म्हणूनच वेळ आहे त्यांच्याकडे पुरेसा

माझ्या प्रेमाने तुला वेढून घ्यावं सूर्यप्रकाशाप्रमाणे आणि तरीही तुला मिळावं तेजस्वी स्वातंत्र्य

प्रेमाविषयी कितीही बोललं तरी ते एक गुपितच आहे
कारण फ़क्त प्रेम करणा–यालाच हे कळत की त्याच्यावरही प्रेम आहे कुणाचं

या मातीच्या बंधातून मुक्ती हे काही तुझं खरं स्वातंत्र्य नाहीच मुळी
तू जे काही आहेस त्यासाठीच तर मी तुझे अनंत कर्ज परत करतोय माझ्या प्रेमातून.

**अनुवाद – स्वप्ना लाड** **मूळ कविता : रवींद्रनाथ टागोर**



|| वाङ्मयवाणी ||

ग्रंथ परीक्षण

# मीच अपराधी

**उमाकांत कोरगावकर**

**मनुजा सावंत**

मीच अपराधी हे नाटक उमाकांत शंकर कोरगावकर यांचे आहे त्यांनी जास्त प्रमाणात साहित्य लेखन केले नाही. 'लेक लाडकी या घरची' हे त्यांचे पहिले नाटक २०१५ मध्ये प्रसिद्ध झाले आणि त्यानंतर मिच अपराधी हे त्यांचे दुसरं नाटक आहे. या नाटकात एकूण दहा पात्रे दर्शवली आहे. या नाटकातील महत्त्वाची पात्रे म्हणजे यतीश, रमिला, जीवन, नागेश, सदा डॉक्टर विनय आणि सहाय्य पात्रे शेडजी, मायकल, इन्स्पेक्टर कशी आहेत. कौटुंबिक वातावरण या नाटकातून आपल्याला पाहायला मिळतो. यतीशाच्या आई वडिलांचा मृत्यू झाला आणि त्यानंतर जीवनचा सर्व शिक्षणाची जबाबदारी व घरातील चढ-उतार हे सगळं यतीश पाहत होता. यतीशचे लग्न रमिलाशी झालो असल्यास तिचा स्वभाव मात्र जरा खोडकर दाखविला आहे. लग्नाच्या काही दिवसांनी यतीश दुबईला कामानिमित्त जातो. त्यावेळी रमिला चंचल स्वभावाची असल्यास आपल्या आतेभाऊ नागेश याच्याबरोबर रात्री-अपरात्री बाहेर फिरते व त्याच्याबरोबर आपले संबंध वाढवते. नागेश हा वाईट प्रवृतीचा माणूस असल्या कारणाने तो रमिलाचा फायदा घेतो. सदा हा त्यांचा नोकर ते प्रत्येक वेळी सर्वांना सांभाळण्याचा प्रयत्न करतो रमिलाच्या विस्कळीत स्वभावामुळे यतीश आपली नोकरी सोडून येतो. नागेशने जीवनची हत्या केली कारण तो रमिला आणि नागेश यांचा नात्यात फुट घालत होता.

लेखकाने या नाटकात एचआयव्ही / एड्स सारखा गंभीर विषय नाटकातून मांडला आहे. रमिला नागेशच्या मुलाची आई बनणार होती पण ती एच.आय.व्ही. बांधित होती. यतीशचा भावाचा मृत्यू झाल्या कारणाने तो दारूच्या नशेत धुंद असायचा. त्याला रमिलाची किळस यायची. पण डॉक्टर विनय त्याच्या आजाराबद्दल सांगतो, पण यतीशला तिची पर्वा नाही.

डॉक्टर विनय यतीशला शब्द देतो की रमिला एचआयव्ही मुक्त मुलाला जन्म देणार. सरकारने आता या रोग मुक्तीसाठी खूप प्रयत्न केले आहे तू फक्त त्या मुलाला तुझे नाव दे आणि रमिला ला तुझ्या आयुष्यात स्वीकार एचआयव्ही झालेला माणूस त्या रोगातून मुक्त होऊ शकतो आणि पंधरा ते वीस वर्ष खुशीत राहू शकतो. फक्त त्या व्यक्तीला चांगले वातावरण पाहिजे.

या नाटकात बोली भाषेबरोबरच मालवणी भाषेचा वापर केलेला दिसून येतो. पती-पत्नीच्या वैवाहिक जीवनात संबंधित बोधपर संदेश देत एच.आय. व्ही.एड्ससारखा गंभीर विषयाबाबत जनजागृती केली आहे. समाजात होणारे बदल आपल्याला या नाटकातून दिसून येतात. कुठलेही पाऊल उचलताना विचार करणे गरजेचे असते. सगळेच व्यक्ती आपल्या वृत्तीचे असतात असे नाही. माणसाची पारख याच्या स्वभाव पाहण्याची नजर या सर्व गोष्टी लक्षात ठेवले पाहिजे.

प्रकाशक : श्री सुदेश काशिनाथ आर्लेकर, जागर प्रकाशन श्री गोपाळकृष्ण मंदिराजवळ, बार्देश, गोवा.
पुस्तकाचे सर्वाधिकार : उर्मिला उमाकांत कोरगावकर
मुखपृष्ट : जागर प्रकाशन, गोवा
प्रथमावृत्ती: दि. ३० मार्च २०१६
मूल्य : १०० रुपये.

## जगणे

जगणे आता उत्सव व्हावे,
क्षण क्षण हे भरभरून जगावे,
पैसा, अडका याही पेक्षा,
फक्त आनंद हेच ध्येय असावे,
तो रुसला का ? ती फुगली का ?
तिथल्या तिथेच सोडून द्यावे,
सॉरीची ती कुबडी घेऊन,
नात्याला त्या उचलून घ्यावे,
कुणी वागला कसे जरीही,
देवाला न्यायाधीश करावे,
सोडुन द्यावे दुखरे क्षण अन्,
जगणे हे आनंदी व्हावे !

**- नम्रता सरोदे**



|| वाङ्मयवाणी ||

# तरीही मी लिहत राहणार..!

हातात बेड्या ठोकूनी छातीत गोळ्या घाला
तरीही मी लिहीत राहणार !

बनावट देशभक्तीने भडकवलेली माथी
त्यात पेरला जाणारा धर्मवाद
असंख्य स्फोट घडवण्यासाठी आखलेला डाव

अर्थशून्य भाषणातून मांडलेला राष्ट्रवाद
बिंधास्त उभा केलेला स्वर्ग-नरकाचा भंकसपणा
बुधवार पेठेत धुसमुस करणाऱ्या बायांची गर्दी
अश्लीलतेने माखत चाललेला फालतूपणा
मजूर अड्ड्यावर विकला गेलेला चांगुलपणा
वाढत जाणारी बेकारी, वाढत जाणाऱ्या आत्महत्या

विकासाच्या वाटेतील कोलमडून पडणारी अर्थव्यवस्था
पुन्हा बाबरी मशिदीवरील राजकारण
पुन्हा राममंदिराच्या नावाखाली घडलेल्या कत्तली
निवडणुकांच्या मैदानातील मताचे गणित
अवकाळी पडलेल्या पावसाचा मारा
चॅनेलवाल्यांच्या लाचारीचा रांडकी चेहरा
युतीच्या घोड्याच्या लगामाची धंदेगिरी
सपाट डोंगरावरील हरवून गेलेली हिवराई
बेलगाम वाढत जाणारी महागाई
नुसत्याच विचारांचे घडवून आणलेले चर्चासत्र
भक्तांच्या घामातून देवाने चालवलेली दुकानदारी
युद्धाच्या दिशेने वाढणारं जागतिकीकरण
धाड धाड घातलेल्या विचारवंतांना गोळ्या
सोयीस्करपणे वाढत चाललेला मनुवाद
गोहत्याबंदीसाठी घडवून आणलेल्या माणसाच्या कत्तली
थरकाप उडवणारी लोकलची गर्दी
क्लासवाल्यांच्या मासावर वाढत जाणारी चरबी
भारत बंद च्या नावाखाली जळणारा समाज
आतंकवादी हल्ल्यात शहिदांचे बलिदान

विद्यापीठात वावरणाऱ्या विचारांच्या चळवळी
अभ्यासाच्या नादात नैराश्यात गेलेली पिढी
रस्त्यावर वाढणारी वाहनांची मोकाट गर्दी
दिवसेंदिवस आटत जाणारी नदी
अगणित वाढत जाणारे जीवघेणे तापमान
संसदेत चालवलेला बेबनाव बाजार धंदा
शिक्षणाच्या नावाने विकला जाणारा बोगसपणा
त्यातून बाहेर पडलेले बुद्धीहीन माणसं
याचं बुद्धीहीनांच्या डोक्यातून बाहेर वावरतोय जीवघेणा रसायन
त्या रसायनानं गुदमरला माझा श्वास
तरीही मी लिहत राहणार !

हेमंत दिनकर सावळे
जिल्हा : वाशिम. मो. नं. : ७८७५१७३८२८



पूजा पवार



पूजा पवार



|| वाङ्मयवाणी ||

# पत्र एक आनंद ठेवा

सौ. शुभांगी ओतूरकर

कुठला धागा आपल्याला कुठे नेईल आणि आठवणींचा कोणता पट उलगडला जाईल याचा नेम नाही.

नुकताच विद्यार्थ्यांना 'गमतीशीर पत्र' हा धडा शिकवित होते. काका आपल्या पुतणीला पत्र पाठवतात. पण ते पत्र कोरं असतं. ती हिरमुसते. तिची मैत्रीण ते पत्र मेणबत्तीवर धरते नी काय आश्चर्य पत्रावरची अक्षर दिसू लागतात. मुलगी खुश होते. मुलांना यामागचं विज्ञान सांगितल्यावर मुलं चर्चेत रंगून गेली नी मला मात्र माझे सारे लहानपणीचे पत्र प्रवासाचे दिवस आठवले.

लहानपणींच्या आठवणींचं आपल्याला खूप आकर्षण असतं.आम्ही बहीण भावंडं, मैत्रिणी एकमेकींना अशीच गमतीशीर पत्र पाठवायचो. कधी उलट अक्षरात, कधी 'च' च्या भाषेत, कधी उजवीकडून डावीकडे लिहिलेली. कोड्यात लिहिलेली. काही पत्र खूप देखणी असायची. दैनंदिन घटनांबरोबर पुस्तकं, नाटक, संगीत यावर चर्चा करणारी. ज्याला कविता, गझल शेरो – शायरीची भरजरी किनार असायची. हा ठेवा मी अलवार जपून ठेवलाय. मित्र मैत्रिणींची ही अशी पत्र पुन्हा पुन्हा वाचणं हा एक आनंद सोहळाच.

संवाद साधण्याचं, मानवी भाव – भावना व्यक्त करण्याचं प्रभावी माध्यम – साधन म्हणून काही वर्षांपूर्वी पत्राकडे पाहिलं जायचं. विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीने, संकेत स्थळांच्या मायाजालात आपण इतके गुंतलो, रमलो की पत्र लेखनाच्या निर्भेळ आनंदासच मुकलोय.

जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या अनेक घटनांचा दुवा कधी साक्षीदार म्हणजे हे पत्र. कारण कोणतंही असो पत्र लिहिलं जायचं, पाठवलं जायचं व तेव्हढ्याच प्रेमाने त्याला उत्तरही यायचं.

नात्यानात्यातील, माणसा–माणसातील नव्हे मनाचा मनाशी असलेला मोकळा संवाद म्हणजे 'पत्र.

पत्र एक साधा सोपा दोन अक्षरी शब्द. ज्यात सगळ्या भाव भावना, प्रेम, माय, राग, लोभ, द्वेष, कणव व्यक्त करणारं पत्र.

पत्र – अंतरीच्या उमाळ्यातून आलेलं. प्रेम, माय आपुलकीचं.

पत्र – आनंदाच्या लाटा वाहून आणणारं, दुःख वाटून घेणारं. पत्र हुरहूर लावणारं, ओढ वाढविणारं.

पत्र – चुकलेल्यांना खडसावून मार्ग दाखविणारं, खंबीर आश्वस्त करणारं.

पत्र – अंर्तबाह्य उजळून टाकणारं, आठवणींची पारायणं करायला लावणारं, जवळ नसताना असण्याचा अहसास देणारं. आणि शब्द म्हणजे आपल्या 'शब्द' 'भावना' पल्याड पोहचविणारं.

सारं घर अश्या पत्राची जीवाचे कान करून वाट पहायचं. ठराविक वेळी येणाऱ्या पोस्टमनची आतुरतेने वाट पहायली जायची. पोस्टमन पत्र दाराला लावायचे बा खिडकीतून टाकून जायचे. अनेकवेळा पोस्टमनही घरातल्या सुख – दुःखाशी जोडले जायचे, घराचाच एक भाग व्हायचे.

घराघरात पत्र ठेवायची अशी खास जागा असायची. कोपऱ्यात तार लावलेली असायची. पत्र वाचून झालं की ते त्या तारेला लावलं जायचं म्हणजे पुन्हा काढून वाचणं सोयीचं होई. पत्र ठेवायची जशी निश्चित जागा असायची तशीच पत्र वाचायची पण असायची बरं का.. हो पण ते पत्र कोणाचं आहे यावरून ठरायचं. एखादा कोपरा, पायऱ्या, जिन्यावर, गच्चीत ठिय्या मारून पत्र वाचली जायची, उरी धरली जायची.

जसं कारण तसं पत्र असायचं. अनेकवेळा परीक्षेतील, स्पर्धांतील यशाचे अभिनंदन, कौतुक करणारी आशिर्वाद पर पत्र असायची. तसचं काही चुकलं की कान उघडणी ही व्हायची. एखाद्या मंगलकार्याचे अगत्याचे आमंत्रण असायचे. यातून परस्परांविषयी ओढ, आत्मीयता दिसून येते. नात्यातील बंध अधिक दृढ व्हायचे.

नातेवाईक, मित्र मैत्रिणी यांना पाठवल्या जाणाऱ्या



॥ वाङ्मयवाणी ॥

पत्रांतून परस्परांच्या सुख दुःखाची देवाणघेवाण व्हायची, अडी–अडचणी सोडविल्या जायच्या. मनं हलकी मोकळी व्हायची. मायेची ऊबदार हवा घेवून आजोळचं पत्र यायचं. काळाच्या ओघात मामाच पत्र खरंच हरवलं. सीमेवरच्या जवानांचा तर जीवनाधार आहेत ही पत्र आज ही.

येणाऱ्या पत्रांवर हात फिरवला की, त्या शब्दास्पशार्तून मायेचा ओलावा गंध जाणवायचा. तसचं पाठवणाऱ्याचा हस्ताक्षर त्याचा मूड स्वभाव सांगायचा. पत्रांतून माणूस समजायला मदत होते. पत्रांतून अनेकांच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग खुलतात. काही पत्र स्वभावासारखीच अघळपघळ भरभरून व्यक्त होणारी तर काही मोजके, मुद्देसूद बोलणारी....सुरू झाली की लगेच संपणारी. आंतरदेशीय पत्राचे चारही कोपरे भरून ही बाकी क्षेम भेटी अंती बोलूच असं म्हणणारी काही पत्रे. काही समीर बसून गप्पा माराव्या इतकी जिवंत.

पत्र म्हणजे अनेक नात्यांना जोडणारा संवाद सेतूच.

या कौटुंबिक स्नेहापलिकडली ही सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक पत्र आपण वाचतो. शिवाजी महाराजांची अधिकाऱ्यांना पत्र, गांधीजींची पत्र, नेहरूंची इंदिरेस पत्र. अब्राहम लिंकनचं 'बाईंस पत्र '.

मराठी साहित्यातील पत्र व्यवहार हा तर अद्भुत असा हवाहवासा शब्द खजिनाच आहे. सानेगुरुजी – विनोबा भावे यांची पत्र, कवी अनिलांची कुसुमावती देशपांडे यांना पत्र, जी. ए. व सुनीताबाईंची उच्च साहित्यिक मूल्य असलेली पत्र.पू.शी. रेगे यांची आनंदभाविनी 'सावित्री' हा पत्र संवादातील मैलाचा दगड.

अनिवार ओढीतून लिहिलेली प्रेमपत्र, कविता हा एक वेगळाच तरल अनुभव. 'पत्र तुझे ते येता अवचित, लाली गाली फुलते नकळत'. 'मज सांग सखे तू सांग मला, पत्रात लिहू मी काय तुला' मराठी, हिंदी सिनेमाही या पत्राच्या महत्त्वाला नाकारू शकले नाही. कैक हिंदी, मराठी प्रेमपत्रांची गाणी गाजली.

पण आजची तरुण पिढी मात्र प्रेमातील या तरल संवादाला मुकली. डिजिटायझेशन, स्क्रीन शॉट,फॉरवर्ड च्या काळात त्यांचं प्रेमही संक्षिप्त स्वरूपात ईमोजीवर व्यक्त होतय. व्हॉट्स अप, मेसेज यामुळे निरोप मिळतोय न ही भावना मनात येऊ लागली. काळाच्या ओघात संवाद माध्यमात वेगाने बदल झाला. संदेश वहनाची अनेक गतिमान साधनं हाती आली. यात पत्र या अकृत्रिम संवादाचा निर्भेळ आनंद आपण गमावून बसलो. पत्र लिहिणं, पाठवणं, त्याची वाट बघणं हा सारा प्रवासंच कालबाह्य झाला. 'चला हवा येऊ द्या' मधील अरविंद जगताप यांच्या पत्रांनी पुन्हा या पत्र प्रवासाला उजाळा दिला. शालेय स्तरावर मुलं केवळ उपयोजित लेखन म्हणून पत्र शिकतात. पत्रांतून व्यक्त होणाऱ्या मोठ्यांबद्दलचा आदर, प्रेम, जिव्हाळा ह्यापासून ही मुलं कोसो मैल दूर आहेत.

मैत्रीतील, नात्यातील सौहार्द, ओलावा टिकावा, रुजावा म्हणून हा पत्ररुपी अकृत्रिम सहज संवाद सुरू राहायला हवा नाही का? मी केलीय सुरवात नी तुम्ही ही लिहिताय नं....

– सौ. शुभांगी समीर ओतूरकर, कल्याण.
Shubha.oturkar@gmail.com

❁❁❁

## संकलित कविता

या सरकारनं आता गॅसवर बसवल
पेट्रोल महाग तेल ही महाग गरिबांना रडवल

रोज कष्ट करुनी आणतो
त्यावरी घर चालवितो.
संसाराचा गाडा ओढतो
कमी पगारात

वीज ही महाग भाज्या ही महाग.
आवश्यक सर्व झाले महाग
पोटाला लागली ही अग
जगू कसा
पगारात वाढ करावी
खाद्य तेल स्वस्त करावी
इंधने ही स्वस्त करावी
फायदे ही होतील जनतेला
जर जनता सुखी असेल
तर देश ही आपला टिकेल
आपले सरकार ही टिकेल
रमाकांत म्हणे

– शुभम गायकवाड

## नवे

पहाट झाली, सूर्याची शलाका,
आभाळभर पसरली
आणि सर्वच नवे झाले
दिवस नवा झाडे नवी
पक्षी नवे अंकूर नवे
अगदी रोजचेच
पण शहरही नवे
सगळेच नवे नवे आणि नवे
निसर्गाची सृजनता म्हणते
माणसाला
अरे माणसा
तुही कर काही कर काही
नवे नवे आणि नवे
जसा मी तसाच तू बन
माझ्यात एकरुप होऊन
तुझं जगणं सुदर कर
मी देईन मग दोन्ही करांनी
सृष्टीचं हे सुंदर स्वप्न
घे ओंजळीत आणि तरल हो
सूर्याच्या सोनेरी स्पर्शा सारखा
तुही कर काही, नवे नवे आणि नवे

- रजनी तांबे

## दवबिंदु

पहाटेला चांदण्या खेळून दमल्या
भुकेल्या झाल्या निजेला आल्या
डोळयातल्या पाण्याचे दवबिंदू झाले
आणि पानांवर ओघळले
चंद्र आणि चांदण्या झोपी गेल्या
सूर्याने हलकेच रात्रीला स्पर्श केला
आणि ती हसली तिची सकाळ झाली
तिचं हसणं पाहून दवबिंदू ही चमकले
सूर्याच्या लक्षात येता येताच नाहीसे झाले
सूर्य मात्र बिचारा त्या चमकल्या मित्रांचा
शोध घेत आहे रोज सकाळी येत आहे

- रजनी तांबे

## सुविचार

अडचणीच्या वेळेत सगळयात मोठा आधार म्हणजे स्वत:वरचा विश्वास जो मंद हास्य करत तुमच्या कानात प्रेमाने सांगत असतो 'सगळं व्यवस्थित होईल'.

ज्यांच्याकडून काही आशा नाही,बहुतकेदा तेच लोक चमत्कार करतात!

माणूस स्वत:च्या चुकांसाठी उत्तम ''वकील'' असतो, परंतु....
दुसऱ्यांच्या चुकांसाठी सरळ ''न्यायाधीश''च बनतो.

काय आहे ते स्वीकारा आणि काय होईल त्यावर विश्वास असू द्या.

जो मनुष्य आपल्या मनाची वेदना, मनातली दु:ख स्पष्टपणे दुसऱ्यांना सांगू शकत नाही, त्याला अधिक राग येत असतो
- रविंद्रनाथ टागोर.

स्वत:ला सुधारण्यात इतके व्यस्त व्हा की तुम्हाला दुसऱ्यांच्या चुका शोधायला वेळच नाही मिळाला पाहिजे.

शस्त्रक्रिया होण्यापूर्वी रोगी घाबरलेला असतो. बरा झाल्यावर शिवलेली जखम तोच कौतुकाने दाखवत सुटतो !! - व. पु. काळे.

चांगले लोक आणि चांगले विचार आपल्याबरोबर असतील तर जगात कुणीही तुमचा पराभव करू शकत नाही.

विचार करूनही फायदा होत नसेल तर खरच विचार करायला हवा.

जर उद्या पर्वत निर्माण करायचा असेल, तर आज दगड जमवायला सुरुवात करा.

संकलन - चंद्रकांत तांबे



|| वाङ्मयवाणी ||

# कथा
# शिरपाची गोष्ट

कथा – प्रकाश फडणीस

नुकतचं एम. ए. पुरं झालं होत, नोकरीचा शोध सुरू झाला होता. सिनीयर कॉलेजवर नोकरी मिळणे नव्हतं आणि ज्युनियर कॉलेजिसमध्ये मिळाली नोकरी ती तात्पुरती नॉनग्रॅट कॉलेजवर... त्यामुळे पगाराची एकतर खात्री नाही आणि मिळालं तर सही एकावर आणि हातात एक रक्कम असे सगळीकडे होते.आणि अशात एका मित्रानं विचारलं की तू एम. आर. का नाही होत?

एम आर म्हंजे ?

म्हंजे मेडीकल रिप्रेझेंटेटीव्ह, मस्त जॉब असतो अरे पॉऽऽऽश

पण मला कोण देणार?

त्यावर तुझी तयारी असेल तर सांग मी काकांना सांगतो ते मोठे साहेब आहेत औषध कंपनीत ते करतील आपलं काम.

आणि खरंच म्हटल्या प्रमाणे मित्राच्या काकांनी मला एमआरची नोकरी मिळवून दिली. आता हातात लेदर बॅग टापटीप ड्रेस नेकटाय घालून माझी नोकरी सुरू झाली. नवीन डॅाक्टरांना भेटायचे त्यांच्यांशी इंग्रीत बोलायचे आणि मुख्य म्हणजे वेळेचं बंधन नाही. दहा डॉक्टरांचे कॉल केले की बास. मस्त एन्जॉय करत चालली होती नोकरी. अचानक एक दिवस एका हॉस्पिटलमध्ये कॉलसाठी वाट बघत बसलो होतो, आणि समोरून आवाज आला पक्या? तू इथं काय करतोयस?

माझा कॉलेजचा मित्र राजा माझ्यासमोर उभा होता, तसे आम्ही शाळासोबती असल्याने फॉरमॅलीटीचा प्रश्नच नव्हता. एव्हाना माझा अवतार आणि टीपीकल लेदर बॅग बघून त्याच्या लक्षात आलं होतं की मी एम आर आहे ते.

तो जोरात हसत म्हणला, च्यायला तू एम आर आहेस तर मी डॉक्टर आहे की नाही मजा? मग त्याने मला ऑफिशीयल आमंत्रण दिले. त्याचं क्लिनीक जवळच्याच तालुक्याच्या गावी होतं. गावात एकटाच डॅाक्टर असल्यानं प्रॅक्टीस छान चालली होती.

मी त्याला यायचं आश्वासन दिलं आणि मनात ठरवून टाकल की येत्या बाजाराच्या दिवशी राजाचा कॉल करायचा.

रविवार उजाडला, मी माझी पांढरी स्कूटर काढली बॅगेत सॅम्पल्स आणि गिफ्ट घातली. व्हीजीटींग कार्ड घेताना आज जास्त भारी वाटत होतं. पुढच्या तासात मी राजाच्या कंपौडमध्ये पोचलो होतो. आतून दोन कुत्र्यांचा आवाज आला. सुदैवाने दोघांनाही बांधल होतं पण कुणीतरी आल्याची वर्दी त्यांनी मालकाला दिली होती. पाठोपाठ डॅाक्टर राजा हसत मुखाने स्वागताला बाहेर आला. भितभीतच मी स्कूटर लावली आणि त्याच्या बरोबर आत गेलो. मित्राचं क्लिनिक बघताना इतक मस्त वाटत होतं. थोडं ऑकवर्ड वाटून नर्वसनेस यायला सुरवात झाली होती. तेवढ्यात पप्पा बघा कोण आलंय, ओळखल का याला. आतून येत पप्पांनी मला बघीतलं आणि त्यांच्या खास स्टाईलमध्ये म्हंजे काय अरे ह्यो पक्या न ओळखायला काय झालं म्हणत माझ्या डोक्यावर हात फिरवत कसा हैस? हाय बरा?

त्या स्पर्शाने माझ्या तोंडातले शब्द आतच जिरले. मी चटकन पप्पांच्या पाया पडलो. त्यांनी दोन्ही हातानी मला उठवलं. पप्पांनी आत आवाज दिला, आवो ऐकलसा काय? कोल्हापुरास्न परकाश आलाय आनी ह्ये बघ जेवल्याबिगर जायच न्हाई?. चालुदे तुमचं पाठमोऱ्या पपाच्यांकडे बघत आता राजाने विचारले, म कसा वाटला दवाखाना? मस्त आय प्रॅक्टीस आपली, जरा कमी मोनोपली म्हणनास.

पक्कयाऽऽऽ माझं एक आहे बघ मी कुठलापण पेशंट ट्रीट करतो. नाही म्हनत नाही. कदी त्यामुळं अगदी आसपासच्या खेड्यातली पेशंट पण माझ्याकडे येतात. गप्पा सुरू होत्या. दरम्यान चहा नास्ताही झाला होता. मला राजाकडं आल्याचं सार्थक झाल्यासारख वाटत होतं. माझ्यातला एम आर पण चांगला धंदा मिळणार म्हणून खुष झाला होता. एवढ्यात कुत्र्याचा आवाज सुरू झाला. पेशंट आहे वाटतं, बस मी बघतो– राजा. एवढ्यात माणसांचा गलकाही ऐकू येऊ लागला. राजा



।। वाङ्मयवाणी ।।

लगबगीने बाहेर गेला. आणि  बाहेर बघीतलं तर गेट बाहेर फळांच्या गाडीवर एक माणूस झोपलेला आणि सोबत ४०-५० माणसांचा जमाव. गेट उघडताच त्यातली दोन माणसं पुढ आली, डाक्टर ह्यो शिरपा. अचानक घाम आला आनी कोसळला बघा. काय बी करा पर वाचवा त्याला, कस्ला तरना ताटा आनी अस काय झालं एकदम डाक्टर?

त्या गंभीर वातावरणात तो धीप्पाड शिरपा गाडीवर निपचीप होता. तेवढ्यात दोन बायकांनी सूर लावला ..काय झालं ग बाईऽऽऽ

आता राजानं सूत्र हातात घेतली. त्यांनी खडसावलं - हे बघा असा कालवा नाही करायचा मी अैना हीतं डॉक्टर?

तुमी सगळी गप बसला तर मला नीट तपासता यील.

लगबगीने त्यातले चार पाच गडी पुढे आले. त्या शिरपाला हाता घाली घालून उचललं आणि दवाखान्यात आणलं, टेबलावर निजवलं. हा प्रकार बघून पप्पांना पण स्फुरण चढल्यासारखं वाटलं. त्यानी बाहेर येऊन मॉबला एक भाषणचं दिलं म्हणा की.

आत टेबलवर शिरपा शांत, राजा दोन्ही खिशात हात घालून फेऱ्या मारतोय. मग हळूच माझ्या जवळ येऊन,  तुला म्हटलं की नाही, मी कुठली केस नाही म्हणत नाही म्हणून. अरे खेड्यात राहायचचं म्हणजे धाडस करायला लागतंय. आत्ता ह्या पेशंटला बहुतेक अटॅक आलाय वाटतं. तर अशा वेळी पेशंटचं बंद पडलेलं हार्ट पुन्हा सुरू करायचं कसं? तर त्याच्या छातीला चोळून चोळून मसाज करुन, असं समजलं ?

मी काहीही न कळून सुध्दा मान हालवली. मग राजा मला म्हणाला, आणि तू यात मला मदत करायचीस. मी मानेनंच होय म्हटलं आणि त्याच्या जवळ उभा राहिलो. तो जोरजोरत शिरपाच्या छातीला मसाज करीत होता. पक्या फॉलो मी, राजानं कमांडिंग आवाजात सांगितलं. मी लगेचच सगळी ताकद लावून मसाज सुरू केला. तेवढ्यात...

पप्पा Is it OK? मी करू का मदत?

नको तुम्ही बाहेर लोकांशी बोला.

मी आपला करतोय मसाज जोरजोरानं. करता करता दहा मिनीटे झाली. सगळी ताकद लावून आता घाम फुटायला सुरुवात झाली. राजाही आता थोडासा दबकला होता. तरीही दोघं करतंच होतो मसाज.

मग हळूच राजा पुटपुटला. पक्या I think he is no more.

मी हळूच, Realy? now what to do?

पुन्हा पप्पा आले आत, Beta improving?

राजाचा पेशन्स सुटला. पप्पा, Will you please. पप्पा लगेच बाहेर गेले.

असाच काही काळ गेला. मी आणि राजा त्या प्रेतालाच मसाज करीत होतो. पुन्हा राजा पुटपुटला, मॉब मोठा आहे रे. कसं काय सांगूया त्यांना.

भला आतापर्यंतचा तो शांत मॉब हळूहळू आक्राळ विक्राळ होतोय आणि आम्ही त्यांच्या तावडीत असं जाणवायला लागलं. तेवढ्यात राजानंच धीर केला आणि बाहेर आला.

हे बघा शिरपाला घरातच एक हार्ट अटॅक आला. त्यावेळेलाच तुम्ही जर आनला असता तर बरं झालं असतं. पण तुम्ही त्याला घरातच ठेवला आणि या गाडीवर घालून आणला हितं. मी माझ्या दोस्तानी आम्ही प्रयत्न केले. पण तुमीच आणायला उशीर केल्यावर आम्ही तरी काय करणार?

डॉक्टर चुक झाली आमची पर आता आम्ही काय करावं म्हंतासा?

हे बघा तुम्ही काय बळंनं केलेलं न्हाई. पण जे झालं ते झालं. आता रडारडी न करता न्या त्याला घरी.

एक वडिलधारा हळू पुढं आला, डॉक्टर चुक झाली आमची, माफ करा आम्हाला. आम्ही गरीब मान्सं माफ करा., डॉक्टर.

डॉक्टर राजा गंभीर चेहऱ्यानं त्या मॉबकडं. थंडगार शिरपाकडं आणि बालमित्राकडं पाहात होता. जणू काही त्या मॉबला माफच करत होता. ज्या गाडीवर घालून शिरपाला आणला होता त्या गाडीवर त्याला घालून स्वतःला दोष देत मॉब दिसेनासा झाला.



|| वाङ्मयवाणी ||

# ती

हेमंत दिनकर सावळे

तिचं लग्न झालं आणि अनोळखी अशा व्यक्तीसंग तिचा संसार चालू झाला. माहेरावरून सासरला निघताना तिला अश्रू डोळ्यातून काढण्याचा तिटकारा असायचा. अनेकाच्या लग्नात या मुली का बरं रडत असतील असा तिला प्रश्न पडायचा पण आज तिच्या लग्नाच्या वेळेस हेच अश्रू तिच्या डोळ्यातूनही नकळत बाहेर पडताचं तिला कळलं की ही भावना आपोआपच येत असते.

लग्नाच्या नंतर ज्या क्षणाची ती आतुरतेने वाट बघत होती ती रात्र तिच्या आयुष्यात आली. रात्रीचे नवं वाजत आले होते. नवंचे दहा झाले पण अजून तिच्या भावना ह्या तिच्या पदराला बांधलेल्या होत्या. तिच्या नवऱ्याची वाट बघत बघत रात्र संपली पण नवरा आलाच नाही. तिला चिंता आणि भीती वाटणं सहाजिकच होतं. अशाच वातावरणात दिवसही संपला. रात्र परत आली आणि तिच्या भावना परत तिच्या पदरालाचं लटकलेल्या होत्या. अचानक दरवाजा उघडला आणि समोर तिला नवरा दिसला. तिच्या आनंदाला तर सीमाच नव्हती पण तो तेवढ्यापुरताच होता. नवरा बायकोशी बोलत होता पण तो बोलता–बोलता कधी झोपला हे तिला सुद्धा कळलं नाही. अशा अवस्थेत काय करावे तिला समजेना. ती तशी मुळात लाजाळूच असल्याने ती पण झोपून गेली आणि तिच्या भावना परत तशाचं राहिल्या. सोनेरी पहाट घेऊन दिवस परत आला. असेच दिवस येत आणि जात होते. तिला कळत नव्हते की आपले लग्न होऊन आज आठ दिवस झाले पण नवऱ्याने तिला स्पर्श सुद्धा का केला नाही. त्याला मी पसंद नव्हती तर त्याने माझ्याशी लग्न का केलं? त्याला मी जर आवडत नसती तर तो माझ्याशी बोलला नसता पण तो माझ्याशी मनमोकळेपणाने बोलतो तरीपण नवरा–बायकोसारखे असं नातं त्यांचात काही नव्हतं. अशाच विचारात रात्र परत आली. आज आपण आपल्याला पडणाऱ्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळवायची असा तिने निर्धार केला.

रात्र आली अन् तोही आला. तिच्या भावनेने आज हद्दपार केली पण तो मात्र शांत होता. तिने तिचे सारे प्रश्न त्याला विचारले पण तिला हवं ते उत्तर मिळत नव्हतं. शेवटी तिने त्याच्या भावना जागृत करण्याचा प्रयत्न केला. तिने त्याच्यावरच जबरदस्ती सुद्धा करण्याचा प्रयत्न केला आणि तिला एक जबरदस्त धक्काच बसला. ती थोडी बाजूला झाली अन् तिची शुद्धचं हरपली. हे सत्य पचवणं तिला शक्यच नव्हतं. नकोसं वाटणार सत्य सुद्धा कधी कधी स्वीकारावं लागतं आणि सत्य हेच होतं की तिचा नवरा षंढ होता.

या विचारानेच तिला झोप सुद्धा येत नव्हती. आपण ज्या सुखात होतो ते सुख आपल्याला कधीच मिळणार नाही. आपल्याला मातृत्व प्राप्त होणार नाही, मग समाजाची बोलणे ऐकावे लागणार. आयुष्यभर त्रास सहन करावा लागणार तोही मरेपर्यंत. ज्यात आपली काही चूक नसताना सुद्धा. नवऱ्याला सोडून आपण कायमचे माहेराला जावं असं तिनं मनाशी ठरवलं आणि दिवस ऊजाडाची वाट बघत राहिली. ती जागी होती आणि तोही. दोघांनाही खूप प्रश्न होते पण तिला आता तिच्या प्रश्नाचे उत्तरं मिळाली होती पण त्याच्या मनाचा थांग तिला लागत नव्हता.

सोनेरी पहाट घेऊन सूर्य परत अंगणात आला. सर्व तयारी करून निघायच्या वाटेवर असतानाच त्याच्याशी काही बोलावं असं ठरवून ती त्याच्याकडे वळली.

तुम्ही माझं आयुष्य असं बर्बाद का केलं. लग्नाच्या आधी हे सर्व सांगितलं असतं तर एवढं घडलं तरी नसतं. रागाच्या भरात तिने त्याला विचारलं. तो आता मनात शब्दांचा किल्ला बांधत होता पण यावेळी त्याला उत्तर देणं भागचं होत.

तुला कसं सांगु?

त्यांने अगदी शांतपणे उत्तर दिलं.

तुम्ही काही जरी सांगितलं तरी मला माझी उत्तरं मिळाली. आता सर्व संपलचं समजा.

या बोलण्यात सुद्धा तिचा राग तसाच होता.

मला तुला फसवायचं नव्हतं. माझ्याबद्दल हे अजून कोणालाच माहिती नाही. तुझ्या भावना मला कळतात पण मी काय करू तूच सांग?

त्याचा तो शांत स्वभाव तसाच होता.



|| वाङ्मयवाणी ||

माझ्या जीवनाचं वाटोळे करून तुम्हाला काय मिळालं, सांगा न?

तिचा राग आता कमी झाला होता.

त्याच्या डोळ्यात पाणी तराळल तसं त्याने डोळे मिटले. त्या पापणीतील आसवासोबत तिचं मनसुद्धा विरघळलं. त्यांच्यातलं नातं संपलं असं म्हणणारी ती त्याच्यासोबतचं उभी होती.

तो पुढे बोलत होता,

मी नऊ वर्षाचा असतानाच आई गेली. अशा लहान वयातच माझा सांभाळ बाबांनी केला. बाबांना खूप एकटेपणा जाणवत होता. त्यांचा एकटेपणा पाहतच मी मोठा झालो. माझाच विचार करून त्यांनी दुसरे लग्न सुद्धा केलं नाही. माझ्या पोराचं लग्न होणार मग मला सुद्धा नातू होणार. मी त्यांच्या संग माझे उरलेले दिवस घालवणार असं ते नेहमी म्हणायचे. त्यामुळे मी माझ्या आजाराबद्दल त्यांना कधीच काही सांगितलं नाही. तसा मी कोणत्या तोंडाने त्यांना सांगणार होतो. त्यांचा तो आनंद, त्यांची स्वप्न मला हिरावून घ्यायची नव्हती म्हणून मी शांत राहिलो आणि आता सुद्धा शांतचं राहणार आहे.

हे सारं काही सांगताना तो व्याकुळ झाला होता पण तिने त्याला धीर देत त्याला जवळ केलं. तिचं मन आता फार बदलून गेलं होतं. ती मुळातच खूप भावनाशील होती. तिने त्याला मिठी मारली आणि आपला निर्णय बदलला. त्यांने तिला जायला सांगितलं, तिला खूप समजावुन सांगितलं पण ती आता जाणार नव्हती.

ती अशीच विचार करत होती. फक्त शरीरसुख मिळालं म्हणजे प्रेम असतं काय? त्यामुळेच आपला संसार चालतो काय? माणसाला प्रेमाचे चार शब्द मिळाले तरीही तो आयुष्यभर जगू शकतो. तरीही तिला मातृत्व प्राप्त होणार नव्हतं याचं तिला दुःख होतंच पण त्याहीपेक्षा आपल्या सासऱ्याला नातवंडाचं सुख मिळणार नाही याच गोष्टीच तिला जास्त दुःख होतं. दिवस सरत होते. दिवस सरता सरता वर्षसुद्धा सरून गेलं.

एक दिवस बाबाने त्याला नातवंडाबद्दल विचारलं पण त्याने कसं तरी निभावून घेतलं पण जे सत्य आहे ते त्यांना सांगणं शक्यच नव्हतं. याबाबतीत तो फारच चिंतीत असायचा. मग त्याने मनाशी ठरवलं आणि तिच्यापाशी आला. ती काहीशी दबकली आणि मनात हसली,

तुम्ही होय, आलात का? थोडा बसून घ्या. असं म्हणत ती पाणी आणण्यासाठी गेली.

अगं, ऐक ना. मला फार महत्वाचं बोलायचंय तुझ्याशी. थोडी तूच बस माझ्या शेजारी. असं तो तिला म्हणाला पण त्या बोलण्यात सुद्धा त्याची चिंता जाणवत होती.

ती त्याच्यापाशी बसली पण तिला हे कसं सांगायचं हे त्यांना कळत नव्हतं. त्याला शब्द सुचत नव्हते. एरवी फार बोलणारा तो आज शब्दांची जुळवाजुळव करत होता. शेवटी त्यांन तिच्याकडे पाहिलं आणि तसाच तो स्तब्ध झाला. तिच्या डोळ्यातील ते नितळ प्रेम त्याला जाणवत होतं. त्यामुळे तो अधिकच खचला. तिचं सालस रूप त्याच्या नजरेत भरुन गेलं होतं पण आपल्या भावना मनात ठेवून त्याला सत्यात येणं भाग होत.

अहो, बोला नं. आज काही वेगळेच वागताय तुम्ही. काही त्रास होत आहे का ? असं तिन अगदी काळजीनं विचारलं.

आपण तिच्याशी बोलावं की नाही हे त्याला कळतच नव्हतं पण बोलल्याशिवाय आता पर्यायच नव्हता.

मला बाबाचं दुःख बघवत नाही ग. त्यांनं अगदी पटकन बोलून टाकलं.

मला सुद्धा नाही बघवतं पण आपण करणार तरी काय तुम्हीचं सांगा न? तिने अगदी शांत उत्तर दिलं.

तरी पण आपल्याला काहीतरी करायलाच हवं आणि ते काय करायचं ते पण मी ठरवलं आहे.

काय ठरवलय तुम्ही तिने अपेक्षित असा प्रश्न केला.

तू दुसऱ्या व्यक्तीसोबत संबंध ठेवून बाळाला जन्म दे. असं तो घाबरतच बोलला.

काय ? ती जोरातच ओरडली.

तुम्हाला लाज कशी वाटत नाही असं बोलताना? ती रागात बोलत होती.

मग मी काय करू, तूच सांग ना. मी असा नाकर्ता आहे. त्यामुळे मी तुला मुलं देऊ शकत नाही. बाबाचं दुःख पण मला बघवत नाही आणि तुझ्या भावनेचं काय? तू माझ्यासाठी असं किती दिवस वांझोट्याचं जीवन जगणार आहेस. तुझ्या एका कृत्यामुळे किती जीवनात आनंद भरून येईल. बाबाला आजोबाचं सुख मिळेल. तुला मातृत्व मिळेल. तुझ्या आनंदात मला सुद्धा आनंद मिळेल. तो तिला समजावून सांगत होता.



|| वाङ्मयवाणी ||

त्याचं तिला समजावून सांगणे आता तिला पटायला लागलं होतं. तो ज्या तिसऱ्या व्यक्ती बद्दल सांगत होता ती व्यक्ती त्याचाच मित्र होता फक्त त्यालाच याच्या रोगांबद्दल माहित होतं. अशाच बेधुंद रात्री त्याचा मित्र आला आणि रात्र संपताच निघून सुद्धा गेला. सूर्याची सोनेरी पहाट पुन्हा अंगणात आली. या पहाटेनेचं त्यांचे जीवन सुद्धा प्रकाशमान केले. असेच दिवस सरत होते आणि तिच्या त्यागाचा फळ तिला मिळणार होतं. बाळंतपणासाठी ती आता माहेरी निघाली होती. तो सुद्धा तिच्याच बरोबरच होता पण गावाची वेस येतात तो माघारी निघाला आणि ती तिच्या माहेरी निघून गेली. रस्त्याने चालताना अंधार पडून गेला होता. त्यामुळे त्याला रस्त्याची वाट सुद्धा दिसत नव्हती. तो अंधाऱ्या रस्ताने वाट तुडवत निघाला. विचारांचे मोहळ मनामध्ये थैमान घालत होते. थोडीशी भीती सुद्धा वाटत होती. अचानकपणे मागून त्याच्यावर कोणत्या तरी हिंस्त्र प्राण्याने हल्ला केला. त्यातचं तो बेशुद्ध पडला. सकाळी डोळे उघडून बघतो तर काय, कुठल्यातरी आश्रमांमध्ये तो होता. त्या आश्रमात फक्त एकच व्यक्ती होती. बहुतेक तो एखादा साधू असावा. साधूने त्याला आपल्या समवेतच राहायला सांगितले. असाही तो घरी जाऊन काय करणार होता. तीसुद्धा माहेरी गेली होती आणि बाबा सुद्धा त्यांच्या नातेवाईकाकडे राहायला गेले होते म्हणूनच त्याने साधू सोबत काही दिवस राहायचे ठरवले. तो साधू बरोबर राहू लागला, जंगलात फिरु लागला. बघता बघता दोन महिने सरुन सुद्धा गेले. साधूने त्याला वन औषधी देऊन त्याच्या रोगाचे निवारण केले. त्यामुळेच त्याला त्याच्या शरीरामध्ये चमत्कारिक बदल जाणवले. आता त्याला त्याचे पौरुषत्व प्राप्त झाले होते. ही आनंदाची बातमी सांगण्यासाठी तो त्याच्या सासरी गेला तर त्यालाच आनंदाचा धक्का बसला. तिच्या पोटी मुलीने जन्म घेतला होता. तो आता बाप झाला होता. या सुखातच ते दोघेही घरी आले. दोघांचाही संसार सुखाने चालू होता. असेचं दिवस सरत होते आणि अशाच एका दिवशी त्याच्या मनात विचार आला. ही मुलगी माझी नाही. आता माझे पौरुषत्व सुद्धा मला मिळाले आहे. आता या मुलीची मला गरज नाही. जन्माला आलेली मुलगी दुसऱ्याच पाप आहे असं तो मनालाच सांगत होता. म्हणूनच मुलीला मारायचा निर्णय त्यानं घेतला. तो तिच्यापाशी आला. तीनं मुलीला जवळ घेऊन झोपी घातलं होतं. त्याने पटकन मुलीला उचलण्याचा प्रयत्न केला. तिच्या लक्षात कदाचित आलं असेल त्यामुळे तिने मुलीला सोडण्यासाठी त्याला विनवणी केली. त्याला आपल्या प्रेमाची शपथ दिली पण तो आता ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. तो तिला मारण्यासाठी ओढत होता आणि ती मुलीला वाचवण्यासाठी प्रयत्न करीत होती. दोघांच्या ओढाताणींमध्ये मुलगी दरवाज्यावर धाडकन आदळली आणि त्या जोराच्या धक्क्यामुळे तिचा मृत्यू झाला. मुलीचा असा मृत्यू झाल्यामुळे तिचा श्वासचं थांबला. थोड्यावेळाने तोसुद्धा भानावर आला आणि त्याच्या मूर्खपणाबद्दल त्याला आता तिरस्कार वाटू लागला पण प्रसंग घडून गेला होता. त्याच आयुष्याचं पूर्ण संपलं होतं आणि तिचं अस्तित्व सुद्धा!

❀❀❀

हेमंत दिनकर सावळे
मु. बेलखेडा पो. आसेगांव (पेन)
ता. रिसोड जि. वाशिम, पिन. ४४४५१०
मो. ७८७५१७३८२८
Email id : hemantsawale15gmail.com


पूजा पवार



।। वाङ्मयवाणी ।।

# अग्निशिखा

अनघा काकडे

माई सावरकर आणि येसुवाहिनी या सावरकर घरण्यातील दोन वीरांगनांवर आधारित मी एक नाटक लिहिल आहे. त्यातील हा एक प्रसंग.

(पडदा वर जातो तेव्हा रंगमंचावर मिणमिणत्या प्रकाशात voice over ऐकू येतो...)

शांताबाई :- परिसाच्या सहवासानं लोखंडाच सुद्धा सोनच होत .... त्याला लक्ष्मीच रूप प्राप्त होत ... तसच माझंही झालं .... असं म्हणतात कि महापुरुषांच्या गृहस्वमिनीच जीवनचरित्र हे गोपाळकृष्णाला वाहिलेल्या तुळशीपत्राप्रमाणे असत .... खरच आहे ते .... आणि याचा प्रत्यय क्षणोक्षणी मला ज्यांच्या सहवासान मिळाला अशा माझ्या दोनही जावा ... मोठ्या बाई ... येसूवहिनी ... माझी दुसरी आईच म्हणा ना ... आणि मधल्या वाहिनी ... माई वाहिनी ...त्या व्यक्ती म्हणून वेगवेगळ्या असल्या तरी त्यांची मानसिक ताकद म्हणजे सावरकर घराची प्राणज्योत .... ती प्राणज्योत त्यांच्याच कार्याने चिरंतन तेवत ठेवण्याच काम आता मी हाती घेतलय .... कार्य नक्कीच सोपं नाही... तेव्हा आता त्यांचा पाऊलवाटेवरून पुन्हा एकदा चालून मार्गदर्शनाचे धडे गिरवण्याचा हा छोटा प्रयत्न ....

(रंगमंच्यावर प्रकाश येतो... जुन्या काळातील बैठे घर दिसते... घरासमोर अंगाणात तुळशीवृंदावन दिसत.... तिन्हीसांजेची वेळ झाली आहे ....आणि माई अंगणात तुळशीसमोर दिवा लावत प्रार्थना करण्यात मग्न आहेत ...)

माई :- माझं सासर गोदामाई । माहेर यमुना ।
श्रेष्ठ संकृतीच्या खुणा । तयामाजी ॥
गोदाकाठ तपस्येचा । कर्मभूमी कृष्णाकाठ ।
देव धर्माच्या राष्ट्राची। त्यांच्या ठाई मिळे वाट।।
पहिली माझी ओवी । ओवी गाईन शिवराया ।
जिजा मातोश्रींच्या पाया । वंदन हे ।।

(माइंचे दुसरे कडवे चालू असताना येसूवहिनी मागून येतात . हातात पत्रासारखा कागद असतो ... येसुवाहुनी कौतुकाने तशाच मागून माइंकडे बघत उभ्या राहतात आणि मग त्याही माईसमवेत हात जोडून मागे उभ्या राहूनच ओवीचे शेवटचे शब्द म्हणतात .... )

येसूवहिनी वंदन हे ! ( माईच्या स्वरात स्वर मिसळून )

माई – वाहिनी तुम्ही कधी आलात ?

वहिनी – कधी आले त्यापेक्षाही वेळेवर आले एवढं खर ...

माई – (थोड गोंधळून) मला कळाल नाही.... काही चुकलंय का माझं ?

वाहिनी – वेडाबाई .... सारखं चुकायला कशाला हवय काही ? आमच्या माईबाई आता मोठ्या झाल्या म्हणायच्या .... ओव्यांमध्ये राष्ट्राचे , स्वातंत्र्याचे विचार येऊ लागलेत ... ( मनाशीच हसतात ... )

माई – काय झालं वाहिनी ?

वाहिनी – काही नाही गं.... विनायक भाऊजी लहान असताना अशीच देशभक्तीपर काव्य रचायचे त्याची आठवण झाली ...

माई – वाहिनी , अहो ... आपल्या आत्मनिष्ठ युवती संघाच्या कार्याची शपथ घेतल्यापासून देवाच्या भक्तीतही देशाचाच काव्य आपसूक तोंडी येतय ...

वाहिनी – पण माई आता काव्यातलं कार्यात उतरायला हवं ....

माई – म्हणजे ?

वहिनी – ये बस इथे.... अशी बातमी आलीये कि विनायक भाऊजींनी लिहिलेला 'शिखांचा इतिहास' हा ग्रंथ इंग्रजांनी तिकडे विलायतेत जप्त केलाय.... त्यामुळे आता विलायतेवरून जेवढ काव्य, साहित्य आपल्यापर्यंत पोचतंय ते आपण इथे लोकांपर्यंत पोहोचवायला हवय ... आणि लोकांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्याची जबाबदारी आता मशाल होऊन सावरकर घराण्याच्या सुनांनीच हाती घ्यायला हवी ना ..?



|| वाङ्मयवाणी ||

माई – ह्मम्म ... ( माई अजून वाहिनी जे बोलल्या त्या विचारातच आहेत .) वाहिनी हे काय ?
वाहिनी – विनायक भाऊजींच माझे मृत्यूपत्र हे काव्य आहे... याचा अनुवाद करून तू तो लोकांपर्यंत पोचववावास अशी माझी इच्छा आहे ...
माई – (बावरून जातात.) वाहिनी पण मी अशी सगळ्यांसमोर एकडच्या स्वरींचे विचार कसे ..
वाहिनी – असं घाबरून कसं चालेल ? तिकडे विलायतेत तुझ्या पतिदेवांच्या भाषणांनी इंग्रजांना वेड गेलय ... आणि तू ही ... अशी अबोल ...
माई – (कौतुकाने लाजत.) एकदाच्या स्वारींची गोष्टच निराळी आहे ....
वाहिनी – हम्म ... काय बाई ते कौतुक ...
माई – वाहिनी ..... पण हा अनुवाद म्हणजे एकडच्या स्वारींची एवढी दूरदृष्टी आणि विचार समजून घेऊन करण ... मला हे शिवधनुष्य पेलायला जमेल ?
वाहिनी – न जमायला काय झालं ? आता लग्न झाल्यापासून सावरकर घराण्याची सून आणि वयाच्या १५ व्या वर्षी भारतमातेला इंग्रजांच्या शृंखलेतून मुक्त करण्याची शपथ ज्यांनी घेतली.... अशा विनायक दामोदर सावरकरांची पत्नी असण्याच शिवधनुष्य समर्थपणे पेलतेच आहेस कि ... मग ?
माई – पण हे कर्तव्यच आहे माझं ....
वाहिनी – मग हे काय आहे ... आपल्याला समाजाला सक्षम करायचं .... अत्याचार करणाऱ्यांपेक्षा अत्याचार करायला संधी निर्माण करणारे जास्त मोठे गुन्हेगार असतात.... बायकांची अशिक्षितता ही त्या गोऱ्या लोकांची ताकद होता कामा नये ... म्हणून हे सगळ ...
माई – हम्म ... तुम्ही आहात ना माझ्या बरोबर ...
वाहिनी – मी असेन नसेन ... पण अनुवाद करताना अनुभव जास्त कमी येतील ....
माई – पण वाहिनी ....
वाहिनी – माई ... (जमेल तुला ... हा स्वर)
माई – ह्मम्म .... लगेच बसते कामाला ....
(येसुवाहिनी मनाशीच हसतात ...)
वाहिनी – मृत्यूलाही संजीवनी देणार काव्य लिहिलंय भाऊजींनी ....
(हे वाक्य ऐकून माई जाता जाता मागे वळून बघतात .... पत्राकडे बघतात... बैठकीवर बसून पत्र वाचतात... वाहिनी पूजेच ताट घेऊन तुळशीला नमस्कार करतात ....)
माई – (बैठकीवर बसून वाचतायत.)

हे मातृभूमि । तुजला मन वाहिलेले ।
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेले ।।
तुतेचि अर्पिली नवी कविता रसाला ।
लेखाप्रती विषय तूचि अनन्य झाला ।।

(आता पुढे काय लिहू या विचारात माई असताना अंगणातून वहिनींचा आवाज येतो.)
वाहिनी – आता दिवा लावताना नकळत ओवीतून जे म्हणालीस ना तेच ...
(माई लिहायला लागतात... येसूवहिनी पूजेच ताट आवरून आत जाताना बसलेल्या माईंच्या डोक्यावरून हात फिरवतात आणि आत जातात...)
माई – (लिहितात) हे मातृभूमी तुला हे मन वाहिले आहे .. वक्तृत्व आणि शब्द वैभव तुझ्यापायी अर्पण केले आहे .. तुझ्याच पायी काव्य प्रतिभा अर्पिली आहे ... आमच्या भाषणांमध्ये , लेखाणांमध्ये मध्ये तुझाच विषय आहे ...
(माईच वाचून होताच दारावर टकटक होते माई घाबरतात.)
माई – वाहिनी ...
वाहिनी – माई थांब तू... मी उघडते ... आलेच ...
माई – वाहिनी .... या वेळेला कोण आला असेल हो ...
वाहिनी – बाळभाऊजी नक्कीच नाहीयेत ... कारण ते दार वाजवण्याच्या आधी आवाज देतात .... माई मी आहे ना ... बघते मी ...
पोलिस – (इंग्लिश acent ) से ... जा संपूर्ण घराची झडती घ्या ...या सावरकरांच्या घरात काही ना काहीतरी हाती लागेलच ...
वाहिनी – पण झडती कशासाठी ?
माई – वाहिनी , मी बाळ भाऊजींना बघून येऊ का ? नाहीतर गोदाताइंना बोलावते ... मला फार भीती वाटतीये ...
वाहिनी – विनायक दामोदर सावरकर लंडनमधून भारतात बॉम्ब पिस्तुले पाठवतात अशी बातमी आहे आमच्याकडे खुदिराम बोस या भारतीय तरुणाने मुझफ्फरपूरच्या डीस्ट्रीट म्याजीस्तीवर बॉम्ब फेकला ...

तसेच बंगाल मध्येही युध्दसाहित्य पोचले आहे ... आणि या सगळ्याचे सूत्रधार लंडनमध्ये असणारे विनायक दामोदर सावरकर आहेत ... हे न कळण्याइतके आम्ही मूर्ख नाही आहोत ... we are not fool लंडनमध्ये शिवजयंती करतायत ....

वाहिनी – अग बाई ... ( आनंदाने )

पोलिस – what ?

वाहिनी – काही नाही... काही नाही .... पण मग या सगळ्याचा झाडतीशी काय संबंध ?

पोलिस – सावरकरांनी भारतात बोंब तयार करायची manuals पाठवली आहेत.

(माई अजूनच घाबरून बाजूच्या खुर्चीत बसतात.)

पोलिस – त्यामुळे तुमच्या घरात ती manuals, बॉम्ब, पिस्तुलं असण्याची शक्यता आहे...म्हणून झडती घेतोय... या तरुणांचा मोठा support सावरकर बंधू आहेत...मोठे सावरकर आमच्याकडे आहेतच.. बंदिस्त... पण आता पुरावे सापडले की बघा कसे हाल – हाल करतो सावरकर घराण्याचे आणि लंडनमध्ये बसून भारतात बॉम्ब पाठवणाऱ्या विनायक सावरकरांचे...फक्त पुरावे मिळाले की झालं...सावरकर संपले (क्रूरपणे हसतो.)

माई – (बोलणं असह्य होऊन आणि घाबरून) तुम्ही काय बोलताय हे.

वाहिनी – माई (ओरडतात...पण त्यात मी आहे नां.. हा स्वर असतो.)

हां...तर घ्या झडती घराची पण मला प्रथम तुमची झडती घेतली पाहिजे

पोलिस – What???

वाहिनी – कारण आम्ही दोघी बायकाच घरात आहोत... आधी तुमची झडती मग घराची झडती (आवाजात करारीपणा आहे.) (वाहिनी झडती घेतात.) हमम्म... झडती हुकुम ?

(इंग्रज अधिकारी प्रश्नार्थक नजरेने बघतो.)

वाहिनी – मी असं विचारूच शकते...कायदाच आहे तसा...मी तुम्हाला घरात येण्यास नकार देत नाहीये पण झडती हुकुम पाहिल्यावरच

पोलिस – (रागाने ओरडतो) you are crossing your limits?

वाहिनी – मी स्त्री आहे हे ध्यानात ठेऊन माझ्याशी बोला (वहिनींचा आवाज चढतो.)

पोलिस – (शरमतो) but, what's your name? नाव काय आहे तुमचं ?

वाहिनी – सौ. सरस्वतीबाई गणेश सावरकर

पोलिस – She is fearless तुम्हाला भीती नाही वाटत... तुमचा नवरा आमच्या ताब्यात असताना...

पोलिस – हे आत्ता मी जातोय..पण लवकरच झडती हुकुम घेऊन येईन (दोघींकडे, घराकडे बघतो आणि जातो.)

माई – (घाबरून) वाहिनी अहो, परवा मी बाळ भाऊजींच्या हातात पुस्तक पहिले म्हणजे, आकार पुस्तकासारखा होता पण आत पिस्तुल होते...तेव्हा मी घाबरून कुणालाच काही बोलले नाही...पण म्हणजे ते पिस्तुल इकडच्या स्वारींनी पाठवलं होतं..???

वाहिनी – माई, अगं पण घाबरायचं कशाला ते उलट असा विचार कर कि तुझ्या इकडच्या स्वारींचा परदेशात शिकायला जाण्याचा उद्देश साध्य होतोय...स्वातंत्र्याचा लढा सशस्त्र बनतोय...आणि हि तर चांगलीच गोष्ट आहे नां ?

माई – वाहिनी खरं सांगू.स्वारी विलायतेला गेले न तेव्हा वाटलं बॅरिस्टर होण्याच्या नादात सशस्त्र क्रांतीचे विचार सुटतील आणि या गोऱ्यांना घालवण्याचा कायदेशीर मार्ग शोधतील वाहिनी...स्वारींचा, मोठ्या भाऊजींचा जीवच त्या नराधमांच्या हातात सापडला तर उपयोग काय सशस्त्र क्रांतीचा

वाहिनी – असे धारदार जीव ज्यांच्या हातात येतील त्यांचे हात आपोआपच कापले जातील माई!

माई – वाहिनी, पण काळजी तर वाटणारच नां..वाहिनी (अहो...वाहिनी)

(वाहिनी माईंना देवघरासमोर नेतात.)

वाहिनी – माई, वयाच्या १६ व्या वर्षी अश्ताभूजेसमोर शपथ घेतली विनायक भाऊजींनी ती एकट्यापुरती नव्हती...मी शत्रूस मारितां मारितां मरेतो झुंजेन...मी म्हणजे एकटे विनायक भाऊजी नाहीत तर संपूर्ण सावरकर कुटुंब...त्या शपथेला भीती या शब्दाची ओळखही नव्हती

माई – वाहिनी, माझं चुकलं मी माई चिपळूणकर नसून



|| वाङ्मयवाणी ||

माई सावरकर आहे याचा विसर पडलेला काही क्षण मला...

वाहिनी – (वहिनींचे डोळे भरून येतात.) पण काळजी कर्तव्याच्या आड नाही येऊ देणार माई... कायम ध्यानात ठेव.. क्रांतिकारकांच्या जीवनात पत्नीचं स्थान हे तलवारीच्या मागच्या मुठीसारख असत... रामरायाने आवाहन केल्याबरोबर आपण उभे राहिलो आणि म्हणालो कि या यज्ञात जळून जायला आम्ही सर्व सावरकर सज्ज आहोत आपल्या कुळाला बलीवानाचा हा सर्वोच्च सन्मान मिळालेला आहे माई...कळतंय का?

(माई ते सर्व ऐकून मंत्रमुग्ध होतात आणि म्हणतात.)

माई – आमंत्रण प्रभू राधुत्त्म सोडिता दे<br>
दिव्यार्थ देवा आमुचे कुल सज्ज आहे ।<br>
हे साध्वी, गर्जुनी असे पहिल्या द्वीचा<br>
हा ईश्वरी मिळविला आम्ही मान साचा ।।

❁❁❁

## जगुन घ्या...

सध्या अनेक गोष्टी आपल्यासमोर येतात ,की एखाद्या व्यक्तिचं निधन झाल ,त्यामध्ये अनेक वयोगटातील मंडळी असतील .असो , हे खरं आहे मृत्यु हा प्रत्येकाच्या आयुष्याचा एक अविभाज्य घटकच आहे. पण कोणाचा अंत कधी हे मात्र निश्चित नाही.पण सांगायचा मुद्दा एवढाच की आपण जीवन जगत असताना जगायचं राहुन जात,ते म्हणजे कसं तर आपण म्हणतो थोडे चांगले दिवस आले की मी हे करीन ते करीन .म्हणजे ज्यामध्ये आपल्याला आनंद मिळतो अशी गोष्ट .पण मला अस वाटत मित्रांनो ह्या जीवनात सगळ्यात किमती वेळआहे .त्यामुळ ह्या जीवनाच्या रंगमंचावर कमी कालावधीत ऊत्तम सादरीकरण करा .त्यामध्ये सगळ्या पात्रांचा अनुभव घेत भरभरुन जागा आहे .त्या परिस्थितीत आनंद मिळवायला शिका .आयुष्य खुप सुंदर आहे, उगीच चिंता करण्यात वेळ वाया नका घालवु इतकचं...

**– केतन गेनबा लावाडे**

**स्वरचित लघु निबंध**

## क्षण...

आनंद हा अत्तरासरखा असतो. सुगंध ओळखायाच्या आत वाऱ्यावर विरुन जातो.आयुष्यातील काही क्षणही तसेच असतात. म्हणूनच वाऱ्यावर विरुन जाण्या पूर्वी ते क़ैद करायचे असतात. म्हणजे आयुष्यभर ते आपली सोबत करतात. अत्तर विरुन जातं. पण क्षण नाही. ते सदैव आपली सोबत करतात. या क्षणांना कैद करून अक्षय करणे ज्याला जमले, तोच खरा आनंदी. एकांतात कुणाची उत्तम सोबत हवी असेल तर ते म्हणजे हे क्षण. मग ते दु:खाचे असो वा आनंदाचे. आपल्याला वेगळ्याच विश्वात नेतात आणि वेळ कसा जातो हे कळतच नाही.हे क्षण म्हणजे आनंदाची कुपीच जणु. ती उघडताच, जादूचा दिवा घसल्यावर जसे वेगळे दिसायला लागते तसे हळूहळू एक एक प्रसंग डोळ्यांसमोर उभा राहतो अगदी क्षणापूर्वी घडल्या सारखा. मनुष्य हा क्षणाचा सोबती असे म्हणतात पण माझ्यामते, क्षणचं मनुष्याची आयुष्यभर सोबत करतात. म्हणूनचं प्रत्येकाने आपल्या आयुष्यातील काही खास क्षण जपुन ठेवावेत. अगदी अत्तराच्या कुपी प्रमाणे !....

**– पूनम गांजाळे**



|| वाङ्मयवाणी ||

## धास्ती

हल्ली मी माझ्या शब्दांना डांबून ठेवलंय...
आणि.. ओठांची दारं घट्ट लावून बाहेरून त्यांना कुलूप घातलंय.

मनाच्या अंधाऱ्या खोलीत त्यांनी नुसता उच्छाद मांडलाय खरा
पण काही केल्या त्यांना आता बाहेर येता येणार नाही.... आणि
तसा प्रयत्न कोणी कधी केलाच तर, बत्तीस धारकरी त्यांना गारद करतील.

आता कोणतेही हुकूमनामे निघू द्या, कोणतेही फतवे जारी होऊ द्या,
माझ्या अस्तित्वाचे पुरावे मागू द्या, कितीही अपमान होऊ द्या......
मी मात्र मौन बाळगणार, निमूटपणे सोसत राहणार .
कारण.....

आता ती सवय लागलीय त्वचेला, मांसाला,रक्ताला आणि मेंदूला.

मी बंडखोर नव्हतो असे नाही, माझ्या जीभेला धार नव्हती असेही नाही.पण.....

समाजाला सत्याच्या मार्गात आणणा-यांचे निरपराध रक्त जेव्हा
बेवारसपणे जमिनीवर पडून आक्रंदन करते...ते पाहून मलाही आता धास्ती वाटत आहे.

**समीर गायकवाड**



पूजा पवार



पूजा पवार



|| वाङ्मयवाणी ||

## आयुष्याच्या गोष्टी

काही गोष्टी सहज मिळतात काही गोष्टींना थांबाव लागत
यालाच तर जगणं म्हणतात इथे प्रत्येकाला कधी हसाव तर कधी रडाव लागत.

चांगल्या गोष्टी आनंद देऊन जातात
वाईट गोष्टी खूप काही शिकवून जातात.

फुल तोडताना किती तरी कळ्या अश्याच पडल्या
त्यांना पडायचं काही नाही कारण त्या पाण्यात पडून ही उमलतच राहिल्या.

काही क्षण रडवतात काही क्षण हसवतात
या तर क्षणांमधून अनेक रंग फुलतात.

चांगल्या गोष्टी पाहण्याआधी वाईट गोष्टी सहन कराव्या लागतं
कारण नदीच्या पाण्यालाही सुंदर धबधबा होण्यासाठी उंचावरून पडाव लागतं.

गुलाबाचं फुल ही सहन करत जगतं
काटे कितीही टोचले तरी ते खुलूनचं दिसतं

– शुभांगी बोयने

## शिक्षणविषयक विचार

खऱ्या विद्यार्थ्यांला कधीच सुट्टी नसते सुट्टीही त्यांच्यासाठी काहीतरी नवीन शिकण्याची संधी असते.

शिक्षणविषयक गाडगेबाबांनी अतिशय प्रभावी विचार मांडले आहेत. ते म्हणतात, सर्व सुधारणांचे महाद्वार म्हणजे शिक्षण. सर्वांगीण विकासाची माहेरघर म्हणजे शिक्षण.

शिक्षण हीच खरी संपत्ती शिक्षणाशिवाय माणूस हा केवळ पशू सारखंच लोक गरिबीत राहिले याचे कारण शिक्षणाचा अभाव.

त्यांनी शिक्षणाविषयी अनेक प्रभावी विचार त्यांच्या कीर्तनांमधून मांडले.धर्मशाळा बांधल्या आणि लोकांना संदेश दिला अरे बाबांनो शिक्षण घ्या गरिबांना शिक्षणासाठी मदत करा. गरिबांच्या मुलाला पाटी पेन्सिल द्या वह्या द्या. अरे आपण स्वत च्या मुलांना परदेशात पाठविण्यासाठी धड पडतो पण गरिबांच्या मुलांना काही देण्याची बुद्धि का रे येत नाही. साक्षरता कार्यक्रम जेव्हा लोकांना विचारले जाते कि लहानपणी का नाही शिकलास? लोक सांगतात गरिबी आपण गरीब का आहोत? कारण शिक्षण नाही? हे दुष्टचक्र भेदण्याचे काम गाडगेबाबांनी केले. गाडगेबाबा म्हणतात विद्या मोठे धन आहे. मोठी गोष्ट आहे ही विद्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पिढ्यांन पिढीत झाडू मारायंच काम केल. त्यांच्या वडिलांना सुबुद्धी सुचली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शाळेत घातलं आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काही लहान सहान कमाई नाही केली. हिंदुस्थानाची घटना केली घटना.

अरे बाबांनो शिक्षणाशिवाय तरूणोपाय नाही शिक्षणा विषयीची तळमळ त्यांच्या विचारांतून आणि कृतींमधून स्पष्ट दिसत होती. जशी आता आपली धडपड दिसते होना.

**– शीला राजेश राहेरकर.**



।। वाङ्मयवाणी ।।